पशुसंवर्धन विभाग
महाराष्ट्र शासन
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ३ रा, प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य



माहे जुलै-२०२५

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ३ रा
माहे जुलै-२०२५

संपादक
**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन
(पशुधन व कुक्कुट)
पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध, पुणे-६७

संकलन, मांडणी व सजावट :
**श्री. संतोष पवार,** पशुधन पर्यवेक्षक

## पशुसंवर्धन विभाग

राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११००७

Email: mahapshudhanvarta@gmail.com

## पशुसंवर्धन विभाग

मागील अंक वाचण्यासाठी खालील
क्युआर कोड स्कॅन करा

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

सत्यमेव जयते



**डॉ. प्रवीणकुमार देवरे** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन , महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

## !! शुभसंदेश !!

भारत सरकारने पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण (LH&DC) कार्यक्रमाचे निरीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेल्या तांत्रिक सल्लागार समितीत महाराष्ट्र राज्याला सदस्यत्व प्रदान केले आहे. ही प्रतिष्ठित समिती कार्यक्रमाची धोरणात्मक आणि तांत्रिक दिशा निश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण (LH&DC) या समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करत असताना लसीची गुणवत्ता, सेरोमॉनिटरिंग आणि सेरोसर्व्हेलन्स यावर तज्ञ मार्गदर्शन प्रदान करणे, राज्य सरकारे आणि ICAR संस्थांनी राष्ट्रीय सुकाणू समितीला सादर केलेल्या प्रस्तावांची शिफारस करणे, लाळखुरकूत आजाराचे (FMD) प्रभावी नियंत्रण व अंतिम निर्मूलनासाठी मानके आणि मापदंड निश्चित करणे आदी कार्य करणे शक्य होणार आहे. या समितीत झालेली नियुक्ती राष्ट्रीय स्तरावर आपल्या राज्याच्या योगदानाची वाढती ओळख दर्शवते.

पशुसंवर्धन विभागाला राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होत असलेल्या या संधी, भविष्यात राज्याच्या पशुसंवर्धनविषयक व्यवसायांमध्ये अनेक आधुनिक बदलांचा अंतर्भाव करणाऱ्या ठरणार आहेत. त्यादृष्टीने विभागाने आतापासूनच धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. अशाच विविध सुरुवातींबाबत पशुपालकांना अवगत करण्यासाठी 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाचा तिसरा अंक आपल्या हाती सोपविताना अतीव हर्ष होतो आहे.

(डॉ. प्रवीणकुमार देवरे)

सत्यमेव जयते



**डॉ. रामास्वामी एन.** (भा.प्र.से.)
सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

राज्यासह देशाच्या सर्वांगीण विकासात दिवसेंदिवस आपली सकार्य सहभागिता वाढविणाऱ्या पशुसंवर्धन विभागाने राष्ट्रीय पातळीवर पशुसंवर्धनातील एक प्रगत व तांत्रिकदृष्ट्या सक्षम राज्य म्हणून आपली वाटचाल अधिक प्रशस्त केली आहे. त्यामुळे पशुसंवर्धनविषयक राष्ट्रीय कार्यमोहिमांमध्ये महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधीत्व मिळत आहे. भारत सरकारने पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण (LH&DC) कार्यक्रमाचे निरीक्षण करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर स्थापन केलेल्या तांत्रिक सल्लागार समितीत आयुक्त पशुसंवर्धन यांची सदस्य म्हणून केलेली नियुक्ती याचेच निदर्शक आहे.

भविष्यात पशुसंवर्धनाच्या व्यवसायांची व्याप्ती वाढविण्यासोबत या व्यवसायांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे समायोजन करण्यास पशुसंवर्धन विभाग प्राधान्य देणार आहे. या संक्रमणांची वाटचाल शब्दबद्ध करत पशुपालक-शेतकरी बांधवांशी या बदलांबाबत संवाद साधता यावा, यासाठी 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाच्या प्रकाशनास पशुसंवर्धन विभागाने प्रारंभ केला आहे. विभागातील प्रकाशनांच्या श्रृखंलेत या मासिकाचा तिसरा अंक आपल्या हाती सोपविताना विशेष आनंद होतो आहे. सदर अंकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

(डॉ. रामास्वामी एन.)

# पशुसंवर्धन विभाग

## महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ३ रा
माहे जुलै-२०२५




**या अंकात..,**


- आधुनिक प्रशासनाची नवी ओळख, सक्षम कर्मचारी-सशक्त शासन
- राज्याच्या मुख्य सचिव पदी मा. राजेश कुमार यांची नियुक्ती
- बोव्हाइन ब्रिडींग ॲक्टच्या माध्यमातून संदर्भमूलक कामकाज करा: **डॉ. रामास्वामी एन.**
- बोव्हाइन ब्रिडींग ॲक्टच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा: मा. आयुक्त पशुसंवर्धन
- राष्ट्रीय वन हेल्थ अभियान अंतर्गत पहिली राज्य व केंद्र शासित प्रदेश यांची संयुक्त कार्यमोहिम दिल्ली येथे संपन्न
- राजस्थान राज्याच्या पशुपालन विभागाच्या उच्चपदस्थ अधिकारी पथकाची पशुरोग प्रतिबंधक लस निर्मिती संस्था व पशुरोग निदान संस्थांच्या उभारणी कार्याच्या अभ्यासासाठी भेट
- **मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना:** ५,२७,८५६ पशुपालकांनी साधला संपर्क, ४,६६,४६१ पशुंना पुरविण्यात आली सेवा
- लम्पी त्वचा रोग: प्रतिबंधात्मक उपायांमुळे नियंत्रण शक्य
- लोकर उत्पादनांना ग्राहकांचा अव्वल प्राधान्यक्रम, प्रशिक्षणासाठी महामंडळाचे विशेष उपक्रम
- **२ ते ३ टन वजनाचा रथ, महिनाभराचे प्रशिक्षण, २५० किमी अंतर-** पालखी रथ ओढणाऱ्या बैलांची विशेष काळजी
- पंढरपुर महास्वच्छता अभियान २०२५
- भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळेत भ्रूण हस्तांतरण तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम
- धुळे येथील कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात पशुसंवर्धन विभागातर्फे कार्यशाळा उत्साहात संपन्न
- ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पशुधन लसीकरण व तपासणी शिबिर
- प्रतापपुर, ता. जत, जि. सांगली येथे पशुउपचार शिबिर उत्साहात संपन्न
- राज्यात २० जुलै रोजी गोशाळा वृक्षारोपण-जतन-संवर्धन समृद्धी अभियान
- **ग्लॅण्डर्स** – अश्वपालकांसाठी एक आव्हान
- मे, जून, जुलै महिन्यात पशुधनाची घ्यावयाची काळजी
- पशुसंवर्धन दिनानिमित्त राज्यभरात ३७१२ शिबिरांचे आयोजन
- सुदृढ पशु, आनंदी शेतकरी...हिच पशुसंवर्धनाची गंमत खरी!
- पावसाळ्यातील पशुधनाचे आजार व नियंत्रण ★**नॅनोतंत्रज्ञानाची क्रांती:** प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविरुद्ध नवा आशावाद
- शेळी व मेंढीपालन प्रशिक्षण माहिती ★**संकल्प:** शुद्ध देशी गोवंश संवर्धनाचा ★कठाणी गोवंश, ★**रेबीजची गोष्ट**




# आधुनिक प्रशासनाची नवी ओळख
# सक्षम कर्मचारी, सशक्त शासन




**देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली सुशासन आणण्यासाठी कार्यरत आहे. सुशासनाचाच एक भाग म्हणून सहा लाखांहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांचा नियुक्ती ते सेवानिवृत्तीपर्यंतचा प्रवास सुकर, सक्षम व अधिक विश्वासार्ह बनवण्यासाठी शासनाने 'महा-आस्था' या नावाने डिजीटल युगातले स्मार्ट प्रशासनाचे कार्यान्वयन सुरु केले आहे.**

सद्यस्थितीत स्वतंत्ररित्या कार्यरत असलेल्या सेवार्थ, महापार निवृत्ती वाहिनी यासारख्या प्रणालींचे एकाच डिजीटल छताखाली एकात्मिकरण करण्यात येत आहे. सुमारे ९० वर्षांच्या कार्यपद्धतीनुसार जुने, हाताने लिहिलेले सेवा अभिलेख सदर प्रणालीमुळे आता डिजीटल स्वरुपात रुपांतरीत होतील. कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रलंबित न्यायालयीन व इतर प्रकरणांची संख्या कमी होईल आणि कार्यक्षमता वाढेल.

याच परिवर्तनाची पुढची पायरी म्हणजे एक स्मार्ट, सुपर्ब आणि सर्वसमावेशक मोबाईल ॲप म्हणजे महा-आस्था मोबाईल ॲप होय. हे महाराष्ट्र शासनाचे एक आधुनिक पाऊल असून, शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सेवेशी संबंधित सर्व सुविधा आता एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. डिजीटल सेवा पुस्तक, वेतनविषयक माहिती, रजा व्यवस्थापन, ई-ऑर्डस, शासन निर्णयांचे अपडेट्स, वाढदिवस व सेवानिवृत्तीची सूचना यामुळे संपूर्ण सेवा प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि नियोजनबद्ध होणार आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत सेवाविषयक बाबींच्या डिजीटल पोर्टलवर सेवापुस्तके अद्यावत करणे व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तपशीलवार माहितीचे ऑन बोर्डिंग करणे यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत प्रदान करण्यात येणारे सेवाविषयक लाभ **(उदा. स्थायित्व प्रमाणपत्र, सेवेतील नियमित दिनांक, वेतनविषयक लाभ इ.)** तसेच सेवानिवृत्तीविषयक लाभ **(उदा. सेवानिवृत्ती वेतन, उपदान, रजा रोखीकरण इ.)** वेळेवर व सुलभरित्या देणे शक्य व्हावे, यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांच्या 'नियुक्ती ते सेवानिवृत्ती' पर्यंतच्या सेवा एकाच प्रणालीशी संलग्न करण्याचा शासनाचा मानस आहे. याकरिता, सामान्य प्रशासन विभागामार्फत ई-मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (e-HRMS) (**महा-आस्था** Maharashtra Advanced Administrative System for Transparent Human Resource Administration- Maha-AASTHA) विकसित करण्यात येत आहे. **अधिक माहितीसाठी:** शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२५ / प्र.क. २७ / मआस्था, दि. २० जून २०२५.

# राज्याच्या मुख्य सचिव पदी मा. राजेश कुमार यांची नियुक्ती




महाराष्ट्र शासनाचे नवनियुक्त मुख्य सचिव मा. श्री. राजेश कुमार (भा.प्र.से.) यांची पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी भेट घेत अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाचे उपसचिव श्री. निवृत्ती मराळे, अवर सचिव डॉ. शैलेश केंडे आदी उपस्थित होते.

> राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या योजनांना अधिक गती देऊन सर्वसामान्यांना आपल्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी काम करणार असल्याचे मुख्य सचिव मा. राजेश कुमार यांनी यावेळी सांगितले.

# राज्याच्या मुख्य सचिवपदी मा. राजेश कुमार यांची नियुक्ती





राज्य शासनाचे नवनियुक्त मुख्य सचिव मा. श्री. राजेश कुमार (भा.प्र.से.) यांची मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), राज्याचे माजी मुख्य सचिव श्री. नितीन करीर (भा.प्र.से.) व अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी भेट घेत अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## मुख्य सचिव मा. राजेश कुमार यांचा अल्पपरिचय व त्यांनी आतापर्यंत भूषविलेली पदे

मुख्य सचिव राजेश कुमार (भाप्रसे १९८८) यांचा जन्म ३ ऑगस्ट १९६५ रोजी झाला. २५ ऑगस्ट १९८८ रोजी ते भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू झाले. मूळचे राजस्थानमधील सवाई माधोपूर येथील असलेल्या राजेश कुमार यांनी इतिहास या विषयात पदव्युत्तर पदवी मिळविलेली आहे. राजेशकुमार यांनी सोलापूर येथे अधिसंख्य सहायक जिल्हाधिकारी पदापासून २४ जुलै १९८९ रोजी आपल्या कारकीर्दीस सुरूवात केली.

त्यानंतर सातारा येथे सहायक जिल्हाधिकारी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती येथे आदिवासी विकास अपर आयुक्त, धाराशीव जिल्हाधिकारी, जळगाव जिल्हाधिकारी, सोलापूर महानगरपालिका आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खासगी सचिव, नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्त, नवी मुंबई येथे एकात्मिक बालविकास आयुक्त, मंत्रालयात पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे अपर मुख्य सचिव तसेच महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव आदी महत्त्वपूर्ण पदांवर त्यांनी काम केले आहे.



# बोव्हाइन ब्रिडींग ॲक्टच्या माध्यमातून संदर्भमूलक कामकाज करा: डॉ. रामास्वामी एन.

गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची सुरुवात महाराष्ट्र राज्याने केली आहे. त्यामुळे आपल्या राज्यात या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केली जाणारी कार्यवाही इतर राज्यांसाठी पथदर्शी ठरू शकेल, अशा पद्धतीने कामकाज होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक माहितीची उपलब्धता करवून घेण्यास प्राधान्य द्यावे लागेल. या कायद्यातंर्गत संबंधित सर्व घटकांची नोंदणी होणे अनिवार्य आहे. माहितीचे संकलन व वर्गीकरण याच माध्यमातून होणार असल्याने नोंदणी आवश्यक असल्याचे अधिकारी वर्गाने लक्षात घ्यावे. नोंदणीसाठी सहज व सुलभ ठरेल, अशा पद्धतीचे सॉफ्टवेयर कार्यान्वित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ च्या कार्यवाहीबाबत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित कार्यशाळेत दूरदृश्य प्रणालीद्वारे दिल्या.

**... तर होणार कारवाई!**

- जेव्हा कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन करुन गोजातीय प्रजनन क्रिया करण्यामध्ये गुंतलेली आहे आणि अशा उल्लंघनाबद्दल, तिच्यावर बजावलेल्या नोटिशींचे एकतर अनुपालन करण्यास किंवा तिच्यावर लादलेला द्रव्यदंड प्रदान करण्यास नकार देत आहे, अशी प्राधिकरणास धास्ती असेल त्याबाबतीत, प्राधिकरणास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, उक्त क्रिया करण्यातून उक्त व्यक्तीला प्रतिरोध करण्यासाठी, महानगर दंडाधिकाऱ्याच्या, किंवा यथास्थिति, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयामध्ये तक्रार दाखल करता येईल.
- अधिनियमातील पोट-कलम (१) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, न्यायालय, अशा कोणत्याही व्यक्तीला, उक्त क्रिया करण्यास प्रतिरोध करणारा आदेश पारित करु शकेल अथवा त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल किंवा असा आदेश पारित करु शकेल.
- या अधिनियमाची कलमे ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र असणारी जी कोणतीही व्यक्ती, राज्य शासनाने व केंद्र सरकारने वेळोवेळी निर्धारित केलेल्या गोजातीय प्रजनन क्रियांशी संबंधित असणाऱ्या विहित मानकांचे पालन करण्यात कसूर करील त्या व्यक्तीस दोष सिद्ध झाल्यावर, पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.
- जो कोणी, नोंदणी प्रमाणपत्र धारण न करता, कोणतीही गोजातीय प्रजनन क्रिया करील अथवा प्रमाणित वळूंव्यतिरिक्त अन्य वळूंपासून गोठवलेल्या रेताचे उत्पादन करील किंवा या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील त्यास, दोष सिद्ध झाल्यावर, एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.
- जी व्यक्ती, ज्या सेवांसाठी तिला नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे, त्या सेवांचा प्रकार व स्वरुप याबद्दलच्या तथ्यांचा विपर्यास करणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातीचा किंवा प्रसिद्धीचा अवलंब करील अशा कोणत्याही व्यक्तीस, दोष सिद्ध झाल्यावर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा होईल किंवा दोन लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अथवा या दोन्ही शिक्षा होतील.

# बोव्हाइन ब्रिडींग ॲक्टच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करा: मा. आयुक्त पशुसंवर्धन

## पशुसंवर्धन आयुक्तालयात महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम कार्यशाळा संपन्न

**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७**

राज्यामध्ये पशुधनाच्या संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढीला प्राधान्य देण्यासाठी प्रजननक्षम वळूंचा रेत संकलनासाठी वापर, गोजातीय रेत संस्करण, साठवण, विक्री व वितरण, गोजातीमध्ये सहयोगी जनन तंत्रज्ञानसह कृत्रिम रेतन करणे यासारख्या गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करून त्याद्वारे गोजातीमध्ये सुधारणा करण्यासाठी "महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३" राज्यात लागू करण्यात आला आहे. या अधिनियमात नमूद माहिती व मार्गदर्शक सूचनांचा संकिर्ण अभ्यास करुन क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रयत्नशील असणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी केले.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ च्या कार्यवा-



हीबाबत अधिकारी वर्गाला कायद्याची माहिती व मार्गदर्शन करण्यासाठी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. देवरे बोलत होते. व्यासपीठावर अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. श्यामकांत पाटील, उपआयुक्त पशुसंवर्धन (म.गो.प्र.अ. तथा पशुधन व कुक्कुट) डॉ. प्रशांत भड उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त पशूसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. प्रवीणकुमार देवरे पुढे म्हणाले, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ हा कायदा लोकांमध्ये जाऊन त्यांना समजावून सांगावा लागणार आहे. या कायद्यामुळे होणारे फायदे पशुपालकांना अवगत करावे लागणार आहेत. त्यामुळे या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावरील अधिकारी वर्गाने या अधिनियमात समाविष्ट प्रत्येक बाब अभ्यासणे आवश्यक आहे. या अधिनियमाचा संकिर्ण अभ्यास केल्याशिवाय त्याची प्रत्यक्ष प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. या कायद्यांतर्गत पशुसंवर्धन विभागाने संशोधित केलेल्या प्रगत प्रजनन साखळीची माहिती पशुपालकांना द्यावी लागणार आहे. यासाठी शासनाच्या विविध विभागांचे व प्रसारमाध्यम संस्थांचे आवश्यक सहकार्य प्राप्त करवून घ्यावे लागणार आहे.



बोव्हाइन ब्रिडींग ॲक्टच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर कार्यशाळांचे आयोजन करुन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी आपले अधिनस्त पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना सदर कायद्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियम) अधिनियम प्राधिकरणाकडून केले जाईल, अशी माहिती प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत भड यांनी यावेळी दिली.

# राष्ट्रीय वन हेल्थ अभियान अंतर्गत पहिली राज्य व केंद्र शासित प्रदेश यांची संयुक्त कार्यमोहिम दिल्ली येथे संपन्न



National One Health Mission (NOHM) अर्थात राष्ट्रीय वन हेल्थ/एकात्मक आरोग्य अभियान अंतर्गत पहिली राज्य आणि केंद्र शासित प्रदेश यांचा सहभाग असलेली कार्यशाळा ९ जून २०२५ रोजी विज्ञान भवन, नवी दिल्ली **येथे** यशस्वीरित्या संपन्न झाली. ज्यामध्ये भारताच्या एकात्मिक एक आरोग्य दृष्टिकोनाला (Integrated One Health) बळकटी देण्यासाठी सर्व संबंधित विभागांच्या सहयोगाचा आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही पार पडली.

या कार्यशाळेचे अध्यक्षपद भारत सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार (PSA) प्रो. अजय सूद यांनी भुषविले. कार्यशाळेत राज्य सरकारी अधिकारी, सर्व भागधारक विभागांचे प्रतिनिधी आणि इतर एजन्सींसह विविध भागधारक सहभागी झालेले होते. मा. अध्यक्षांनी उद्घाटनपर भाषणात कार्यशाळेचा दृष्टिकोन आणि या अभियानाच्या उद्दिष्टांना पुढे नेण्यात राज्य सरकारांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या सचिव सुश्री पुण्यसलिला श्रीवास्तव यांनी या उपक्रमाचे कौतुक करत राज्यांनी संसाधनांच्या संरेखनाद्वारे पायाभूत सुविधा मजबूत करणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले. आरोग्य संशोधन विभागाचे सचिव आणि भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. राजीव बहल यांनी वन हेल्थ आव्हानांना तोंड देण्यासाठी बहु-क्षेत्रीय सहभाग महत्त्वाचा असून, याकरीता बहुलक्षणीय विकार वेळीच ओळखण्यासाठी संनिरिक्षण करणे आणि विषाणुयुद्ध अभ्यासासारख्या प्रतिकात्मक कवायतींद्वारे RRT व आंतरक्षेत्रीय समन्वय यांच्या तयारींची चाचपणी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. सिंदुरा गणपती व पी.एस.ए.फेलो यांनी अभियानाच्या उद्दिष्टांचा आणि प्रशासन यंत्रणेचा आढावा सादर केला. यावेळी अभियानाच्या प्रशासकीय समित्यांवर चक्राकार पध्दतीने नामनिर्देशित गुजरात आणि केरळच्या प्रतिनिधींनी त्यांच्या राज्यांच्या 'वनहेल्थ' उपक्रमांतर्गत प्रशासन, संस्थात्मक यंत्रणा, देखरेख प्रगती इत्यादी बाबींचे सादरीकरण केले. उद्घाटन सत्रादरम्यान, 'वनहेल्थ' मोहिमेसाठी युवा सहभाग कार्यक्रम आणि 'वनहेल्थ' उपक्रमांवर डॅशबोर्ड ...

# राष्ट्रीय वन हेल्थ अभियान अंतर्गत पहिली राज्य व केंद्र शासित प्रदेश यांची संयुक्त कार्यमोहिम दिल्ली येथे संपन्न

यांचा शुभारंभ करण्यात आला. (https://www.psa.gov.in/oneHealthDashboar).

कार्यशाळेत दोन प्रमुख सत्रांमध्ये सहभागींनी अभियानाशी संबंधित प्रशासन आणि धोरण, देखरेखप्रणाली, प्रादुर्भाव तपास आणि प्रतिसाद, क्षमताबांधणी आणि डेटा शेअरिंग या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली.

डॉ. परविंदर मैनी पीएसए कार्यालयाचे वैज्ञानिक सचिव यांच्या अध्यक्षतेखाली वन हेल्थ अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यांसोबत नियोजन सत्र पार पडले. यासत्राचे उद्दिष्ट राज्यांमधील मानवी, प्राणी आणि पर्यावरणीय आरोग्यासाठी लवचिक व एकात्मिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी समन्वयाच्या संधी शोधणे, विद्यमान आव्हानांना तोंड देणे आणि कृतीयोग्य धोरणे तयार करणे हे होते.

पुढील वाटचालीसाठी अध्यक्षांनी सर्व राज्ये / केंद्रशासित प्रदेशांनी त्यांचे वन हेल्थ डॅशबोर्ड आणि वेबसाइट तयार करुन ते केंद्रीय डॅशबोर्ड / वेबसाइटशी जोडण्याचे आणि क्षमताबांधणीसाठी लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. त्यासाठी iGoT कर्मयोगीसारख्या सुविधांनी अभ्यासक्रम विकसित करण्याचे आवाहन केले. तसेच डेटा मानकीकरणाची, वन हेल्थ हॅकेथॉनद्वारे तरुणांचा सहभाग करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

राष्ट्रीय रोगनियंत्रण केंद्र (NCDC), भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आणि पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग (DAHD) यांनी भारतातील वन हेल्थ दृष्टिकोनाला बळकटी देणाऱ्या इतर संस्थांसोबत देखरेख आणि सहकार्य या बाबींवर आधारीत व्यापक कार्यक्रमांवर सादरीकरण केले.

कार्यशाळेदरम्यान, भित्तीपत्रक सादरीकरण प्रदर्शनी आयोजित करण्यात आले होते. राज्य, केंद्रशासित प्रदेश, विविध संस्थांनी हाती घेतलेले वन हेल्थ उपक्रम सादर केले. या कार्यक्रमात सुमारे २८ राज्ये / केंद्रशासित प्रदेश, बहुपक्षीय आणि शैक्षणिक संस्थांसारख्या इत्यादींचा सहभाग होता.

या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडून मा. डॉ. रामास्वामी एन., सचिव (पदुम) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई आणि डॉ. शितलकुमार मुकणे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे हे सहभागी झाले होते.

राष्ट्रीय रोगनियंत्रण केंद्र NCDC, राष्ट्रीय सुरक्षा समन्वय सचिवालय (NSCS), आर्मी मेडिकल कॉर्प्स (AMC), रिमाउंट व्हेटर्नरी कॉर्प्स (RVC) आणि राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था (NIV) यांच्या समन्वयाने रोगप्रादुर्भावाच्या परिस्थितीवर एक प्रतिरुप सरावाने कार्यशाळेचा समारोप झाला.





National One Health Mission (NOHM) कार्यशाळेत पशुसंवर्धन विभागाकडून सहभागी झाले मा. डॉ. रामास्वामी एन., सचिव (पदुम) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई

# राजस्थान राज्याच्या पशुपालन विभागाच्या उच्चपदस्थ अधिकारी पथकाची पशुरोग प्रतिबंधक लस निर्मिती संस्था व पशुरोग निदान संस्थांच्या उभारणी कार्याच्या अभ्यासासाठी भेट

दि. १२ जून व १३ जून २०२५ या कालावधीत डॉ. लक्ष्मण मुत्तेपवार, सहसंचालक तथा अतिरिक्त संचालक (अ. का.) आणि डॉ. विवेक माथुर, उपसंचालक प्रादेशिक पशुवैद्यकीय जैवपदार्थ प्रयोगशाळा, जमडोली, जयपूर, पशुपालन विभाग, राजस्थान हे महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्याअंतर्गत पुणे येथे भेटीस आले होते.

यावेळी त्यांनी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांची भेट घेऊन राजस्थान राज्यातील प्रादेशिक पशुवैद्यकीय जैवपदार्थ प्रयोगशाळेच्या आदर्श उत्पादन प्रणाली (GMP) मानकांच्या अनुपालना अंतर्गत बळकटीकरण, सुधारणा व आधुनिकीकरणाकरीता नियोजन व निधी उभारणीबाबत मार्गदर्शन घेतले.

पथकाने नुकत्याच उद्घाटन झालेल्या भारतरत्न अटलबिहारी....










वाजपेयी राज्यस्तरीय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळेस भेट देऊन पहाणी केली व उभारणीबाबत चर्चा केली. दि. १३ जून २०२५ रोजी सदर उच्चस्तरिय पथकाने पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे या संस्थेस भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेतील जिवाणूलस, विषाणूलस, लस गुणनियंत्रण इत्यादी आधुनिक सुविधांची पहाणी केली. भेटीनंतर चर्चेदम्यान संस्थेतील अधिकारी / तज्ञांनी या पथकास आदर्श उत्पादन प्रणाली (GMP) मानकांच्या अनुपालना अंतर्गत बळकटीकरण, सुधारणा व आधुनिकीकरण आदी बाबींच्या अंमलबजावणीकरीता अवलंबवायच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शन केले. सदर भेटी अंती पथकाने राज्याच्या दौऱ्यात मिळालेल्या माहिती व सहकार्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच राजस्थान राज्यात अशीच सुविधा उभारणीबाबत प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

# मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना

पशुवैद्यकीय सेवेसाठी

डायल करा १९६२







## ५,२७,८५६ पशुपालकांनी साधला संपर्क, ४,६६,४६१ पशुंना पुरविण्यात आली पशुवैद्यकीय सेवा

राज्यातील ३२ जिल्ह्यातील ७३ तालुक्यांमध्ये सुसज्ज वाहनांसह फिरती पशुवैद्यकीय पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

**सुविधा:-** फिरत्या पशुचिकित्सा वाहनांकडे रोगनिदानासाठी सूक्ष्मदर्शक यंत्र, शस्त्रक्रिया साहित्य, कृत्रिम रेतन उपकरणे, औषधी, शवविच्छेदन व नमुने गोळा करणेसाठी साहित्य याबरोबरच विस्तार कार्यासाठी उपयुक्त दूरचित्रवाणी व ध्वनीक्षेपक संच उपलब्ध आहे.

**मनुष्यबळ:-**फिरत्या पथकांसाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या असून, वाहनचालक/मदतनीस बीएसए कॉर्पोरेशन लि. पुणे या पुरवठादाराद्वारा बाह्यस्रोताद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**कॉलसेंटर:-** पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे मध्यवर्ती कॉल सेंटर BFIL यांचे सहाय्याने कार्यान्वित असून १९६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक पशुवैद्यकीय सेवा, फिरते पशुचिकित्सा पथकांद्वारे पशुपालकांच्या दारात उपलब्ध करून प्रदान करण्यात आली आहेत.

**कार्यपध्दती:-**क्षेत्रीय स्तरावरुन पशुपालाकांकडून पशुचिकित्सा व इतर अनुषंगिक बाबींसाठी प्राप्त होणाऱ्या विनंतीची नोंद प्रशिक्षीत मनुष्यबळामार्फत संगणक प्रणालीवर तात्काळ घेवून मध्यवर्ती कॉल सेंटर मार्फत नजीकच्या पशुवैद्यकिय दवाखाना अथवा फिरत्या पशुचिकित्सा पथकाकडे अग्रेषित करण्यात येते. रोग लक्षणांचे गांभीर्य लक्षात घेवून वर्गीकृत केलेल्या १०८ पशुरोगांमधील रोग लक्षणांशी तुलना करुन पशुवैद्यकिय अधिकाऱ्यास अंदाजीत रोग त्या अनुषंगाने अपेक्षीत कमाल प्रतिसाद वेळ याबाबत महापशुधन संजिवनी ॲपद्वारे माहिती तात्काळ कळविली जाते. या बरोबरच पशुपालकास एसएमएसद्वारे त्यांच्याकडे भेट देणाऱ्या पशुवैद्यकिय अधिकाऱ्याचे नाव व दुरध्वनी क्रमांक कळविला जातो. पशुवैद्यकास सदरची माहिती कॉल सेंटर कडून मिळाल्यानंतर एक तासाच्या आत पशुपालकासोबत संपर्कानंतर भेटीची वेळ अंतिम केली जाते. रोग लक्षणानुसार विहित केलेल्या कालावधीत पशुवैद्यकाने भेट देवून उपचार व अनुषंगीक बाबींची माहिती **महापशुधन संजिवनी ॲप** मध्ये अद्यावत करणे अपेक्षित आहे. कॉल सेंटरद्वारे पशुपालकाशी संपर्क करुन त्याला सदर सेवेबद्दलचे अभिप्राय विचारले जातात.

**योजनेचे तांत्रिक कामकाज:-** कॉलसेटरकडे दि.३१.०१.२०२५ रोजी पर्यंत राज्यातून ५,२७,८५६ पशुपालकांनी संपर्क साधला होता. त्यापैकी सध्या कार्यरत असलेल्या फिरत्या पशुचिकीत्सा पथकांमार्फत ४,६६,४६१ पशुंना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात आलेल्या आहेत. ६१,६९५ पशुपालकांना पशुआरोग्य, पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना याविषयी मार्गदर्शन तसेच सल्ला देण्यात आलेला आहे.

**कामकाजाचे संनियंत्रण:-** योजनेच्या प्रभावी सनियंत्रणासाठी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) हे तालुका नोडल व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय हे जिल्हा नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत.

# लंपी त्वचा रोग: प्रतिबंधक उपचारांमुळे नियंत्रण शक्य

हा विषाणूजन्य साथीचा आजार असून, या आजारात गाई-म्हशीला ज्वर व त्वचेवर गाठी दिसून येतात. या रोगाचा प्रसार चावणाऱ्या माशी, डास, गोचिड, किटक, चिलटे इ. बाह्य परोपजीवींकडून एका जनावरापासून दुसऱ्या जनावराला होतो. या रोगावर आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील आहेत. राज्यात कुठेही या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास तात्काळ पशुसंवर्धन विभागाला माहिती देण्यात यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

**रोगप्रसार :**

- डास, चावणा-या माश्या,
- गोचिड, चिलटे,
- बाधित जनावराचा स्पर्श
- दुषित चारा-पाणी






मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

**लंपी आजाराला त्वरित घाला आळा ॥ पशुपालकांनो आपले पशुधन सांभाळा॥**

**लक्षणेः**

- अंगावर १० ते २० मि.मी. व्यासाच्या गाठी
- सुरुवातीस भरपूर ताप
- डोळ्यातून व नाकातून चिकट स्राव
- चारा पाणी खाणे कमी अथवा बंद
- दूध उत्पादन कमी
- काही जनावरात पायावर सूज येणे व लंगडणे

**अधिक माहितीसाठी संपर्क**

नजीकचा शासकीय पशु वैद्यकीय दवाखाना
मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेचा टोल फ्री क्र.
१९६२

**पशुपालकांनी घ्यावयाची काळजी**

- चारा कमी खाणाऱ्या जनावराचा तात्काळ ताप मोजावा व नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावा.
- बाधित जनावरे निरोगी जनावरांपासून वेगळी ठेवावीत, तसेच पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनानुसार पशुधनाचे लसीकरण करुन घ्यावे.
- कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेशास बंदी करणे.
- रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित जनावरांना चराऊ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करणे.
- डास, माश्या, गोचिड व तत्सम कीटकांचा पशुवैद्यकाच्या सल्ल्याने औषधांचा वापर करून बंदोबस्त करणे. तसेच, निरोगी जनावरांच्या अंगावर कीटक येवू नयेत म्हणून औषध लावणे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करणे.
- आजारी जनावरांवर विषारी औषध फवारणी करू नये.
- रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच जनावरांच्या स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंध करणे.
- त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर औषधी मलम लावावे.
- प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ मधील कलम ४(१) अन्वये पशुंमध्ये या रोगाची लक्षणे आढळून आल्यास प्रत्येक व्यक्ती, अशासकीय संस्था, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांनी लेखी स्वरूपात नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेस कळविणे बंधनकारक आहे.
- वेळेवर उपचार केल्यास हा रोग निश्चितच बरा होतो, त्यासाठी पशुपालकांनी सजग असणे आवश्यक आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ

सत्यमेव जयते


# लोकर उत्पादनांना ग्राहकांचा अव्वल पसंतीक्रम

## उत्पादनांच्या निर्मितीसाठी महामंडळामार्फत विशेष प्रशिक्षण कार्यक्रम



**(डॉ. शितलकुमार मुकणे)**
अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन तथा
व्यवस्थापकीय संचालक,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र
मेंढी व शेळी विकास महामंडळ,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची स्थापना कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणी क्र. २०५६०/CTA नुसार दि. ८ ऑगस्ट, १९७८ रोजी करण्यात आली आहे. महाराष्ट्रात विदेशी / स्थानिक/ संकरित शेळ्या-मेंढयांची पैदास प्रक्षेत्र स्थापन करणे व त्याचा विस्तार करणे, शेळ्या-मेंढ्यांच्या पैदाशीकरिता उपयुक्त ठिकाणी अशा केंद्रांची वाढ करणे. शेळ्या-मेंढ्या आणि त्यापासून उत्पादित होणाऱ्या वस्तूंची आयात निर्यात करणे, शेळ्या-मेंढ्यांची पैदास करणे आणि विक्री करणे, स्थानिक शेळ्या-मेंढ्यांची वंशावळ सुधारण्यासाठी संकरित पैदास कार्यक्रम हाती घेणे / अथवा अशा कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाला मदत करणे, शेळ्या-मेंढयांच्या गुणवत्तेत सुधारणा घडवून पशुपालकांना प्रती शेळी-मेंढी मिळणाऱ्या उत्पादनात वाढ होऊन शेळी-मेंढीपालन व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शासनाच्या मदतीने / मदतीशिवाय विस्तार केंद्रे स्थापन करणे, शेळी-मेंढी पालनाला उत्तेजन देण्यासाठी सहकारी संस्था, व्यक्ती अथवा फर्म यांना वित्तीय पुरवठा करणेकरिता मदत करणे आदी उद्दिष्टांची पूर्तता या महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.



पशुपालक-शेतकरी बांधवांना दर्जेदार उच्च गुणवत्तेचे पशुधन पुरविण्यासोबत महामंडळाने लोकरपासून उत्पादीत वस्तूंच्या विक्रीतून चांगला नफा मिळवत विभागाच्या महसुली उत्पन्नात मोठी भर टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. महामंडळाने सन २०२० ते २०२५ या कालावधीत लोकरपासून निर्मित विविध उत्पादनांची एकूण ९० लाख ५१ हजार ७०५ रुपयांची विक्री केली आहे. प्रक्षेत्रा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्यामुळे सुशिक्षीत बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचे महामंडळाने मोठ्या कौशल्याने केले आहे. लोकरीच्या वस्तूंना वाढत जाणारी मागणी लक्षात घेता भविष्यात उत्पादनाची टक्केवारी वाढविण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये,

**लोकर कातरणी सुविधा:** महाराष्ट्रामध्ये उत्पादित होणारी लोकर ही मुळातच अखूड धाग्याची आहे व त्यामध्ये हेयर फायबरचे प्रमाण जास्त असून, ती जाडी भरडी स्वरुपाची असते. त्यामुळे पारंपारिक पध्दतीने लोकर कातरणी केल्यास कात्रीचे पाते लोकरीच्या मुळापर्यंत जाऊ शकत नाही. परिणामी, लोकरीच्या धाग्याचा तुकडा पडून उत्पादनात घट होते, तसेच लोकरीची प्रतवारी खालवून लोकरीला कमी भाव मिळून मेषपालकांचे आर्थिक नुकसान होते. यावर उपाय म्हणून महामंडळाने यांत्रिक लोकर कातरणीची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्यामुळे मेंढ्यांना इजा होत नाही व धागा अखंड मिळून चांगल्या प्रतीची लोकर मिळाल्याने लोकरीस योग्य भाव प्राप्त होऊन उत्पादनात वाढ व वेळेची बचत होण्यास मदत होते. मेंढ्यांची लोकर नाममात्र शुल्क आकारून म्हणजेच रु. १०/- प्रती मेंढी या दराने केली जाते.

**लोकर खरेदी सुविधा:** योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे राज्यातील मेंढपाळांच्या लोकरीला योग्य भाव प्राप्त होणेकरिता त्यांना बाजारपेठ उपलबध करुन देणे हा आहे. त्यानुसार केंद्रीय लोकर विकास मंडळ, जोधपूर यांच्या अर्थसहाय्याने महामंडळामार्फत लोकर खरेदी योजना राबविण्यात येत आहे. ही योजना महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रावर राबविण्यांत येत असून, खरेदी केलेल्या लोकरीपासून जेन, उश्या, घोंगडी इ. लोकरवस्तुंचे उत्पादन करण्यात येते.

**विणकाम प्रशिक्षण:** हातमागावर लोकर वस्तू विणकामाचे प्रशिक्षण देण्यांत येते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे, ग्रामिण भागातील लोकरीच्या व्यवसायास चालना मिळवून देणे, लोकर विणकाम सहकारी संस्थाना मदत करणे, बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन



देशात तसेच विदेशात बाजारपेठ मिळवून देणे व मेंढीपालन व्यवसाय वाढीस चालना मिळवून देणे हा आहे. सदर विणकाम प्रशिक्षण महामंडळाच्या खालील प्रक्षेत्रांवर उपलब्ध आहे.

१) लोकर उपयोगिता केंद्र, मुख्यालय, गोखलेनगर, पुणे-१६.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पडेगांव, जि.छत्रपती संभाजीनगर.

३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र रांजणी, ता.कवठेमहांकाळ जि.सांगली

**लोकर वस्तुंची विक्री:** विविध प्रदर्शनांत महामंडळ सहभागी होऊन लोकर वस्तुंची विक्री करत असते. तसेच किसान प्रदर्शनामध्ये महामंडळामार्फत वूलन एक्स्पोचे आयोजन करण्यात येते. या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, जम्मू काश्मिर, हिमाचल प्रदेश, कर्नाटक येथील लोकर उत्पादक सहभागी होऊन शुध्द लोकरीचे स्वेटर, मफलर, जॅकेट, शाल, आसन, जेन, सतरंजी, चादर, ब्लँकेटस्, घोंगडी, नमदा, उशा इत्यादी लोकर वस्तू योग्य दरामध्ये विक्रीसाठी ठेवून सहभागी विणकरांना प्रोत्साहित करण्यात येते. वरील वस्तू सर्व प्रक्षेत्रावर उपलब्ध आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळातर्फे निर्मित लोकर उत्पादनांचा तपशील

| तपशील | आकारमान (फूट) | विक्री किंमत |
|---|---|---|
| घोंगडी | ५ x ७.५ | १२०० |
| शाल | ३.५ x ६.५ | ७०० |
| पूजा आसन | २ x २ | २०० |
| मफलर | ०.७५ x ६ | २०० |
| चेअर कारपेट | २ x २ | २५० |
| चादर | ५ x ७.५ | ११२० |
| सतरंजी | ६ x १० | ३००० |
| सतरंजी | ५ x ७.५ | २१०० |
| सतरंजी | ३.५ x ६.५ | १४०० |
| गालिचा | २ x २ | ५१० |
| जेन | ४ x ६ | ११५० |
| जेन | ३.५ x ६.५ | ९५० |
| जेन | ५ x ७ | १३०० |
| घडीची जेन | ३ x ६ | १५०० |
| उशी | १.३३ x २ | २०० |
| गादी | ३ x ६ | १५०० |
| गादी | ५ x ७ | ३१०० |
| झेन आसन | २ x २ | २०० |
| नमदा | ४ x ६ | ०० |
| कारपेट | ४ x ६ | ०० |



**पूजा आसन :** १०० % पांढऱ्या लोकरीपासून हे आसन बनविले जातात. मुख्यत्वेकरून जप, तप, ध्यान-धारणा इत्यादी धार्मिक कार्यामध्ये या असनांचा वापर होतो. १०० टक्के लोकर सूत वापरुन तयार केलेल्या या आसनाचे आकारमान २ x २ फूट व किंमत रु. २००/- इतकी आहे.



**गादी:** या गादीमध्ये लोकरीचा वापर केला आहे. त्यामुळे या गादीवर झोपल्याने पाठदुखी, मणक्याचे आजार बरे होतात त्याचबरोबर रक्ताभिसरण व्यवस्थित होते. वजन: २० व ९ किलोग्रॅम, किंमत: ३१००/-, १५००/- रुपये साईज: ५x७.५ / ३x६ फूट



**चादर:** ही चादर सोलापूरी चादरी सारखी असून, विविध रंग व डिझाईनमध्ये उपलब्ध आहे. लोकरीपासून बनविली असल्यामुळे थंडीमध्ये ऊबदार राहते. या चादरीचे विणकाम हातमागावर केलेले असल्याने ही चादर १० ते १५ वर्ष सहज टिकते. **वजन**: २ किलोग्रॅम **किंमत**: रु. ११२०/- **साईज**: ५x७.५ फूट



**मफलर:** १००% लोकरीच्या धाग्यांपासून हातमागावर बनविण्यात येते. उबदार असते. विविध रंग व डिझाईनमध्ये उपलब्ध आहे. वजन: ०.२५० किलो ग्रॅम, किंमत: रु. २००/-, साईज: ०.७५x६ फूट, मंगल कार्यासाठी उपयुक्त.



**सतरंजी:** विविध आकारमान, रंग व डिझाइनमध्ये उपलब्ध आहेत. लोकर सुताचा वापर केल्यामुळे थंडीपासून बचाव करण्यासाठी या सतरंजीचा उपयोग होतो. वृध्दांना संधीवाताचा त्रास होतो, त्यांच्यासाठी ही सतरंजी फार उपयुक्त आहेत. तसेच लग्नसभारंभ व धार्मिक कार्यक्रमांमध्ये या सतरंजीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. वजन: ४.०० किलो ग्रॅम, ३.०० किलो ग्रॅम, २.००किलो ग्रॅम, किंमत: रु. ३०००/-,२१००/-, १४००/- साईज : ६x१० / ५x७.५ / ३x६ फूट

# २ ते ३ टन वजनाचा रथ, महिनाभराचे प्रशिक्षण, २५० किमी अंतर

## माऊलींचा पालखी रथ ओढणाऱ्या बैलांची घेतली जाते विशेष काळजी




**'महापशुधन वार्ता' कक्षा मार्फत,**

वारी म्हणजे महाराष्ट्राच्या धार्मिक व अध्यात्मिक एकात्मतेचा मानबिंदू. श्री क्षेत्र पंढरपुर येथे पांडुरंगाच्या दर्शनासाठी शेकडो किलोमीटर पायपीट करणाऱ्या वारकऱ्यांचा हा भक्तीसोहळा देशातील काही महत्वपुर्ण अध्यात्मिक उत्सवांपैकी एक मानला जातो. महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाला शेकडो वर्षांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. अध्यात्माची पताका अंगाखांद्यावर घेत पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघालेल्या वारकऱ्यांसोबत माऊलींचा पालखीरथ ओढण्यासाठी बैलांचा उपयोग केला जातो. पुण्यातून देहू येथून श्री संत तुकाराम महाराज व आळंदी येथून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी रथ पंढरपूरकडे वारीच्या निमित्ताने दरवर्षी मार्गस्थ होत असतो. अनेक चढउतारांसह मोठमोठ्या घाटांना पार करणाऱ्या या २५० किलोमीटरच्या प्रवासात बैलांची विशेष काळजी घेतली जाते. ऐतिहासिक वारीच्या गौरवशाली वाटचालीतील वृषभसेवेची माहिती देणारे हे वृत्त ...

माउलींच्या पालखी सोहळा हा अवघ्या महाराष्ट्राला अध्यात्मिक उब प्रदान करणारा एक ऊर्जादायी सोहळा म्हणून गणला जातो. शेकडो वर्षांपासून प्रशिक्षीत बैलांद्वारे माऊलींच्या पालखी रथाला ओढण्याचे कार्य पार पाडले जाते. मानवाच्या संकिर्ण विकास व प्रगतीत पशुधनाने समर्पित भावनेने किती महत्वपूर्ण योगदान दिले आहे, याची प्रचिती वारीत सहभागी पशुधनावरुन येते.

पालखीरथ ओढण्यासाठी मानाच्या बैलजोडीची निवड करणे, यामागेही एक परंपरा आहे. रथ ओढण्याचे भाग्य सहज कोणाच्या पदरात पडणारे नसते. आळंदीतल्या ठराविक सहा कुटुंबांकडे हा मान आहे. रानवडे, कोंढरे, भोसले, वरवडे, कुऱ्हाडे आणि वहिले या कुटुंबांकडे दरवर्षी हा मान आलटून पालटून जात असतो. याउलट तुकाराम महाराजांच्या पालखीला मात्र हा मान मिळवण्यासाठी कोणीही शेतकरी अर्ज करू शकतो. अर्ज केलेल्या बैलजोड्यांचे व्यवस्थित परीक्षण करून त्या वर्षासाठी हा मान निवडलेल्या दोन शेतकऱ्यांना देण्यात येतो.

माऊलींचा रथ अतिशय दिमाखदार असतो. या रथावर केलेले नक्षीकाम भाविकांना आकर्षित करणारे असते. या रथाला नक्षीकाम केलेल्या दहा महिरपी आहेत. रथाचे चार गज व तीन घुमट तोलण्यासाठी आठ मजबूत स्तंभ, गरुड हनुमंतांच्या प्रतिकृती व रथाच्या सौंदर्यात भर घालणारे ११ कळस, यामुळे रथाचे वजन साधारणपणे दोन ते तीन टनापर्यंत आहे. याशिवाय माऊलींच्या रथाला आकर्षक पुष्पसजावट करण्यात येते. त्यामुळे रथाच्या एकूण वजनात आणखी भर पडते. पालखी रथाला पुष्पसजावट करण्यासाठी नोंदणी आवश्यक असते. माऊलींचा हा अवजड रथ ओढण्यासाठी बैलंही ताकदवान असावी लागतात. खिलार ही गोवंशीय प्रजाती अधिक रुबाबदार व देखणी मानली जाते. उच्च व धिप्पाड बांधा, अलंकारीक वशिंड, उंच व बाकदार शिंगे व अवजड रथ ओढण्याची या बैलांची नैसर्गिक क्षमता लक्षात घेता पालखी रथ ओढण्यासाठी खिलार गोवंशाचा वापर केला जातो.

ज्या पशुपालक-शेतकऱ्यांच्या बैलांची निवड पालखी रथ ओढण्यासाठी होते, त्या पशुपालक-शेतकऱ्यांकडून बैलांना एक महिना अगोदर सराव देऊन त्यांची क्षमतावृद्धी साधली जाते. यासाठी वजनदार बैलगाडी घाटमाथ्यावरुन ओढणे, शेतात नांगरणी व कुळवणी करणे आदी कामे बैलांकडून करवून घेतली जाते. त्यांना आवश्यक खुराक व संतुलित आहार दिला जातो. या बैलजोडीची किंमत लाखो रुपयांपर्यंत असते. प्रवासादरम्यान, बैलांच्या उर्जेची, बूस्टर डोसची आणि सलाईनची काळजी घेतली जाते. वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित असतात, मागील डॉक्टरांच्या उपचारांच्या आधारे पुढचा डॉक्टर त्यांचा उपचार ठरवतो. बैलांना कोमट पाण्याने आंघोळ घातली जाते. तसेच, ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी दोनदा कॉर्न फ्लोअर दिले जाते.

पालखी यात्रेदरम्यान, लोकांनी बैलांना वारंवार खाऊ घालू नये याची काळजी घेतली जाते. कारण यामुळे बैलांच्या आरोग्याला हानी पोहोचण्याची शक्यता असते. त्यांच्या खाण्याच्या सवयींमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. यादरम्यान, पशुवैद्यकीय सेवा २४ x ७ कार्यरत असतात. पालखीमार्गावरील स्थानिक पशुवैद्यकीय केंद्राच्या तज्ञ अधिकारी व कर्मचारी यांच्यावर बैलांच्या आरोग्यविषयक उपचारांची जबाबदारी पार पाडतात. पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी या कार्यात स्वत:ला वाहून घेत बैलांच्या उपचार व सेवार्थ आपले समर्पित योगदान वारीमध्ये देत असतात.




वारीदरम्यान बैलांची विशेष काळजी घ्यावी लागते. त्यांना गरम पाण्याने धुतले जाते, तसेच विश्रांतीदरम्यान बसण्यासाठी मॅटची व्यवस्था केली जाते. पावसात भिजल्यानंतर बैलांना लगोलग कोरडे केले जाते. दररोज २० टक्के हिरवा व ८० टक्के सुका चारा दिला जातो. सुका चारा पचनास सुलभ असल्याने बैलाची पचनसंस्था चांगली राहते. संत तुकाराम महाराज पालखी रथाच्या मानाच्या बैलजोडीचे नाव सर्जा-राजा असून, संत ज्ञानेश्वर माऊली पालखी रथाच्या मानाच्या बैलजोडीचे नाव राजा-प्रधान असे आहे. वारीपुर्वी बैलांच्या प्राथमिक आरोग्य तपासणी व उपचाराचे कार्य जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औंध येथील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. बाळासाहेब गायकवाड यांच्या संनियंत्रण व मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आले. पालखी मार्गावर स्थानिक पशुवैद्यकीय केंद्रांमार्फत आवश्यकतेनुसार बैलांवर उपचार व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.







# आषाढी एकादशी

वारी स्पेशल











# पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५







पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान २०२५ अंतर्गत शहरात सकाळी ७ ते १० यादरम्यान एकाचवेळी ४२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून कचरा संकलन करण्यात आले. या मोहिमेत सोलापूर जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक, विविध सामाजिक संघटना यांनी सहभाग घेऊन अभियान यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

यामध्ये पशुसंवर्धन विभागाने रेल्वे मैदान व दत्त घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी आपल्या पूर्वनियोजित सोलापूर दौऱ्यावर असलेल्या मा. डॉ. समीर बोरकर (प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन पुणे विभाग, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विशाल येवले (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, सोलापूर), डॉ नवनाथ नरळे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व जिल्ह्यातील सर्व सहायक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहायक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व परिचर यांनी सहभागी होऊन स्वच्छता अभियान यशस्वीपणे पार पाडले.

# भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळेत भ्रूण हस्तांतरण तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम

**प्रत्येक जिल्ह्यातून ५ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची होणार प्रशिक्षणासाठी निवड**

पशुसंवर्धन विभागामार्फत भ्रूण हस्तांतरण तंत्रज्ञानासाठी १० पशुवैद्यकांच्या तिसऱ्या तुकडीला ताथवडे (जि. पुणे) येथील भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळेत प्रशिक्षण देण्यात आले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दाराशी भ्रूण हस्तांतरण सुविधेचा लाभ पोहचविण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या क्षेत्रीय पशुवैद्यकांसाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत असते. दि. २ जून २०२५ रोजी शासनाच्या पशुसंवर्धन विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांच्या हस्ते या ५ दिवसांच्या प्रात्यक्षिक गोवंशीय भ्रूण हस्तांतरण प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.



मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पशुसंवर्धन विभागाने या तंत्रज्ञानासाठी प्रती जिल्हा ५ याप्रमाणे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन केले आहे. पशुसंवर्धन विभागाकडून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची निवड त्यांच्या पदव्युत्तर पात्रता, अनुभव आणि क्षेत्रीय स्तरावर हे तंत्रज्ञान पुढे नेण्याची इच्छाशक्ती, यावर आधारित आहे. सदर निकषांवर आधारीत प्रशिक्षणार्थींची निवड डॉ. शामकांत पाटील (सहआयुक्त पशुसंवर्धन, (मुख्यालय)) यांनी केली.

या ५ दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत प्रशिक्षणार्थी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना गो-महिषवर्गीय पशुधनातील शरीरशास्त्र, पॅथोफिजियोलॉजी, माजाचे नियमन आणि गर्भ हस्तांतरण तंत्रांचे सैद्धांतिक तसेच प्रत्यक्ष ज्ञान उपलब्ध होईल, अशा पद्धतीने नियोजन करण्यात आले होते. प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधा डॉ. शितलकुमार मुकणे (मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपुर) यांनी भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे पुणे येथे उपलब्ध करून दिल्या. गोवंशीय वंध्यत्व तज्ञ डॉ. भूपेंद्र भारद्वाज (कृषी विज्ञान केंद्र, उदयपूर, राजस्थान), डॉ. अजित माळी (सहाय्यक प्राध्यापक, क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ, जि. सातारा), डॉ. रतिकांत नवटाके (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, ताथवडे, पुणे), पशुधन विकास अधिकारी डॉ. भरत सांगळे, डॉ. अमोल आहेर यांच्यासह आणि गोवंशीय भ्रूण हस्तांतरण क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक डॉ. श्याम झवर (श्याम आयव्हीएफ, उरळीकांचन, पुणे), डॉ. घाडगे (बीएआयएफ), डॉ. सतीश हरकल (गोदरेज मॅक्सिमिल्क, नाशिक) आणि डॉ. कैलास कदम (भद्रा प्रजनन केंद्र, छत्रपती संभाजीनगर) आदींनी सदरचे प्रशिक्षण अधिक माहितीपूर्ण करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. सदर प्रशिक्षणाचे नियोजन डॉ. विष्णू जवणे (राज्य समन्वय अधिकारी, भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन) यांनी केले होते.

# भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळेत भ्रूण हस्तांतरण तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम










# धुळे येथील कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात पशुसंवर्धन विभागातर्फे कार्यशाळा उत्साहात संपन्न



दि. २७ जून २०२५ रोजी धुळे येथील कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाचे सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी व पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये खाजगीरित्या सेवा देणारे पशुसेवक यांची कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी नाशिक विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. बाबुराव नरवाडे तसेच विभागीय रोग प्रयोगशाळा येथील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. मिलिंद भणगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत त्यांच्या शंकांचे समाधान केले. यावेळी एबीएस कंपनीच्या प्रतिनिधींनी सेक्स सॉर्टेड सिमेनचे महत्व व त्याचा उपयोग यासंदर्भात उत्तम मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. गिरीश पाटील, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संदीप निकम, सहाय्यक आयुक्त डॉ. वाडीले तसेच सर्व अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पशुधन लसीकरण व तपासणी शिबिर



पावसाळ्यात जनावरांना साथीच्या आजारांपासून संरक्षण मिळावे यासाठी नागापूर येथे पशुवैद्यकीय दवाखाना पळशी आणि कृषी महाविद्यालय उमरखेड (यवतमाळ) यांच्या संयुक्त विद्यमाने पशुधन लसीकरण व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिकन्यांनी दिनांक २७ जून रोजी घेतलेल्या या उपक्रमात लंपी, घटसर्फ, फऱ्या, वंध्यत्व तपासणी, कृत्रिम रेतन तसेच विविध विषाणूजन्य व जिवाणूजन्य आजारांचे लसीकरण व उपचार करण्यात आले.एकूण १३० ते १५० जनावरांची तपासणी व लसीकरण करण्यात आले. पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रतीक इंगळे व डॉ. गोपाल गव्हाड यांनी जनावरांचे संगोपन, लसीकरणाचे महत्त्व, योग्य वेळ व लसीकरण करताना घ्यावयाची काळजी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमात कृषी महाविद्यालय उमरखेडचे प्राचार्य एस. के. चिंतले, कार्यानुभव अधिकारी ए. बी. इंगळे, सहाय्यक प्राध्यापक वाय. एस. वाकोडे व कार्यक्रम समन्वयक ए. एस. राऊत यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात कृषिकन्या धनश्री ठाकरे, पल्लवी अमटे, शुभांगी वावधने, मोनाली येनुरकर, सुजाता मुने आणि गायत्री जुनगरे यांनी सक्रिय सहभाग घेतला. नागापूर येथील नागरिकांनीही उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला.

# प्रतापपुर, ता. जत, जि. सांगली येथे पशुउपचार शिबिर उत्साहात संपन्न

## १६३१ पशुधनाची तपासणी व यशस्वी उपचार, पशुपालकांमध्ये समाधान



सांगली जिल्ह्यातील जत तालुका हा तसे पाहता अवर्षणग्रस्त तालुका म्हणून गणला जातो. त्यामुळे येथील हंगामी शेतीला हमखास उत्पन्न देणारा पशुसंवर्धनाचा व्यवसाय करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. या भागात दुग्धव्यवसाय, शेळीपालन, मेंढीपालन व कुक्कुटपालन व्यवसाय दिवसेंदिवस वाढू लागला आहे. त्यामुळे स्थानिक स्तरावरील अर्थचक्र गतिमान होण्यास मोठा हातभार लागला आहे. येथील शेतकरी बांधवांना त्यांच्या पशुधनाच्या आरोग्याशी संबंधित सेवा व सुविधा विनासायास प्राप्त व्हाव्यात, यासाठी या भागात पशुआरोग्य निदान व उपचार शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात येत असते. दि.५ जून २०२५ मध्ये पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, कुंभारी अंतर्गत प्रतापपुर येथे आयोजित शिबिरात १६३१ पशुधनाचे निदान व यशस्वी उपचार करण्यात आले.

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, कुंभारी अंतर्गत प्रतापपुर या गावामध्ये गाय वर्गातील पशुधनाची संख्या ३८९, म्हैस वर्गातील पशुधनाची संख्या ४५२, शेळी वर्गातील पशुधनाची संख्या ७६५ व मेंढ्यांची संख्या १२०७ आहे. सहकारी तसेच खाजगी दूध संकलन संस्थांचे जाळे या भागात तयार होत असल्याने दुग्धव्यवसायाला या भागात चालना मिळत आहे. त्यामुळे गाय व म्हैसवर्गीय पशुधनात सातत्याने वाढ होत आहे. सदर व्यवसाय करताना पशुपालकांना पशुसंवर्धनविषयक सेवा व सुविधा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अजयनाथ थोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात पशुउपचार शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, कुंभारी अंतर्गत प्रतापपुर या गावामधील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यासोबत समन्वय सभा घेण्यात आली. ग्रामपंचायत मार्फत गावातील सर्व प्रभागामध्ये शिबिराबाबत दवंडी देण्यात आली. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, कुंभारी मार्फत शिबिरापुर्वी एक आठवडा दररोज प्रत्येक पशुपालकाच्या घरी, गावातील चावडीवरती व दूध संकलन केंद्रांवरती जाऊन प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली.









शिबिरामध्ये पशुधनावर करण्यात आलेल्या उपचारांचा तपशील

| अ.क्र. | उपक्रम | पशुधनाचा वर्ग | पशुधनाची संख्या |
|---|---|---|---|
| १ | उपचार | गाय + म्हैस | ४० + ३५ = ७५ |
| २ | गर्भतपासणी | गाय + म्हैस | २५ + १५ = ४० |
| ३ | वांझ तपासणी | गाय + म्हैस | २२ + १९ = ४१ |
| ४ | लसीकरण | | ६८२ |
| ५ | शस्त्रक्रिया | | ०६ |
| ६ | खच्चीकरण | | ०४ |
| ७ | जंतनाशक वाटप | | ७८३ |
| ८ | एकूण | | १६३१ |

**सोशल मिडियाचा प्रभावी वापर**

सदर शिबिराच्या आयोजनाबाबत पशुपालकांना माहिती देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने स्थानिक पातळीवर विविध व्हॉटस् ग्रुप, इन्स्ट्राग्राम, फेसबुक यासारख्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्सचा कौशल्याने वापर केला. याशिवाय पशुउपचारासाठी आवश्यक औषधांचा पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित कंपन्यांशी संपर्क साधण्यात आला. त्यामुळे पशुपालकांना या शिबिरातच पुढील उपचारासाठी आवश्यक औषधांचा पुरवठा करणे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना शक्य झाले.

# आटपाडी (जि. सांगली) बाजारामध्ये बकऱ्याची ३ लाख ३१ हजार रुपयांना विक्रमी विक्री

सांगली जिल्ह्यात आटपाडी येथील शेळ्या-मेंढ्यांच्या आठवडा बाजारात मेथवडे (ता. सांगोला) येथील मेंढपाळाच्या बकऱ्याची विक्रमी ३ लाख ३१ हजार रुपयांना विक्री झाली, तर बाजारात या सप्ताहात शेळ्या-मेंढ्यांची तब्बल साडेचार कोटी रुपयांची उलाढाल झाली.

आटपाडीच्या शेळ्या-मेंढ्या, बोकड, बकरे खरेदीसाठी सांगली, सोलापुर, कोल्हापुर, विटा, कऱ्हाड, सातारा, पुणे, गोवा येथील व्यापारी मोठ्या संख्येने येत असतात. दर आठवड्याला दिडशे ते दोनशे चारचाकी पिकअप गाड्या भरुन नेतात. तसेच हौशी मेंढपाळ याच बाजारातून दर्जेदार मेंढ्यांचा कळप वाढविण्यासाठी प्रजोत्पादनाच्या उद्देशाने देखणे लहान-मोठे बकरे खरेदी करतात. आटपाडीच्या बाजारात दिवसेंदिवस व्यापारी आणि मेंढपाळांची पशुधन खरेदीला पसंतीह वाढत आहे. त्यामुळे बाजारात आवक वाढून उलाढालीतही मोठी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे.

दि. २८ जून रोजी आठवडे बाजारात मेथवडे येथील शंकर माळी यांच्या अत्यंत देखण्या बकऱ्याचा ३ लाख ३१ हजार रुपयांना व्यवहार झाला. पिलीव (ता. माळशिरस) येथील रविंद्र घुले या हौशी मेंढपाळाने बकऱ्याची खरेदी केली. बकरा पाहण्यासाठी मेंढपाळांनी यावेळी बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती. आठवडा बाजारात जून महिन्याच्या शेवटच्या सप्ताहात तब्बल साडेचार कोटींची उलाढाल झाली. बकरा मालक व खरेदीदारांचा सभापती संतोष पुजारी, उपसभापती सुनील सरक व सचिव शशिकांत जाधव यांनी सन्मान केला. यावेळी संचालक सुबाराव पाटील, मोहन कोरे, शिवाजी काळे, हरी पाटील, बाबू जराग, नामदेव जराग, भीमराव पुजारी, कैलास देवडकर, अप्पा खरात आदी उपस्थित होते.







आटपाडी येथील आदर्श पशुपालक पुरस्कार विजेते शेतकरी श्री. सोमनाथ माळीजाधव यांच्याकडून हा बकरा तीन ते चार महिने वयाचा असताना २ लाख १ हजार रुपयांना खरेदी केला होता. त्याचे ९ ते १० महिने शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन केले. दररोज संतुलित खाद्य, लिव्हर टॉनिक व मिनरल मिक्श्चरचा समावेश आहारात केला. संगोपनासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे पशुधनाला एवढा विक्रमी दर मिळाल्याचे शंकर माळी सांगतात.

# राज्यात २० जुलै रोजी गोशाळा वृक्षारोपण-जतन-संवर्धन समृद्धी अभियान

**महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे -६७ द्वारा,**

गो संरक्षण आणि संवर्धनाच्या कार्ययज्ञासाठी गोशाळा परिसरात बहुमूल्य अशा देशी वंशाच्या वृक्षांचे रोपण, जतन, संवर्धन करण्यासाठी आग्रही पुढाकार घेतल्यास गोसांभाळ अनंत पटीने सुलभ आणि सुकर होण्यास मदत होईल. त्याकरिता, गोशाळेच्या परिसरात दि. २० जुलै ते २४ जुलै या कालावधीत किमान ५५ बहुउपयोगी वृक्षांचे रोपण करून गोशाळा वृक्षारोपण-जतन-संवर्धन समृद्धी अभियानाचे आयोजन करावे, असे आवाहन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री. शेखर मुंदडा यांनी केले आहे.

डॉ. मुंदडा यांनी सांगितले की, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे, हा संतांनी दिलेला जीवन समृद्धीचा मार्ग आपल्या सर्वांसाठी अत्यंत मोलाचा असून, निसर्गातील वृक्षसंपदा आणि सजीवांच्या संवर्धनातून अधिक सुलभता निर्माण करणे आपले आद्यकर्तव्य आहे. महामहीम राष्ट्रपती महोदयांनी जीवनधन अशी अमूल्य उपमा आपल्या निसर्गसंपदेतील प्राणीमात्रांना दिल्यामुळे आत्मनिर्भर गोसांभाळ गतिमान होत आहे. वृक्षारोपणाच्या या उपक्रमात सुजाण नागरिक, गोप्रेमी, समाजसेवक, स्नेहीवृंद आदींना सहभागी करून घेतल्यास त्याची यशस्विता वाढेल. या उपक्रमातंर्गत राबवलेल्या वृक्षसमृद्धी कालावधीचे सविस्तर अहवाल आणि छायाचित्रे आयोगाकडे प्राप्त झाल्यास पुढील कालावधीत हा उपक्रम आणखी व्यापक स्वरुपात आयोजित करण्यास मदत होईल. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने व एक सजग नागरिक म्हणून या उपक्रमात आपले समर्पित योगदान प्रत्येकाने द्यावे, असे आवाहन श्री. शेखर मुंदडा यांनी केले आहे.

> **महा-एनजीओ फेडरेशनद्वारा राज्यातील ५५ संस्थांसोबत गोशाळांमध्ये 'गोसेवा हरित सेवा या संकल्पनेतंर्गत वृक्षारोपण अभियान आयोजित करण्यात येणार आहे. राज्यात वृक्षसंपदा बळकटीकरण आवश्यक असून, त्याद्वारे गोधनसंपदाही सुदृढ व आरोग्यमय होण्यास मोठी मदत होणार आहे. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोसेवा आयोगमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती श्री. शेखर मुंदडा यांनी दिली आहे.**






# पशुपालकांनी मे, जून व जुलै महिन्यात करावयाची कामे



**मे**

- ❖ हिरवा चारा लागवडीसंदर्भात नियोजन करुन शेतामध्ये गावरान खत टाकावे. उभी आणि आडवी नांगरणी करुन शेत लागवडीसाठी तयार करावे.
- ❖ मे महिन्याच्या शेवटी / १५ जूनपर्यंत फऱ्या, घटसर्प रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.
- ❖ जनावरांचे उन्हापासून संरक्षण करण्यासाठी गोणपाटाचे ओले पडदे गोठ्याभोवती लावावेत.
- ❖ पाणी रांजणात २ ते ३ तास साठवून ठेवावे. थंड पाणी पिल्याने जनावरांची तहान भागते.
- ❖ कोंबड्यांच्या शेडचे पडदे व्यवस्थित करुन छिद्रे बंद करावीत.
- ❖ उन्हाळयात कोंबडयांना स्वच्छ व थंड पाणी सतत उपलब्ध करुन द्यावे. उष्माघातापासून कोंबड्यांचा बचाव करण्यासाठी तापमान नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.
- ❖ पशुवैद्यकाच्या सल्ल्याने ताण विरहक औषधे वापरुन कोंबड्यांमधील ताण कमी करावा.

**जून**

- ❖ जनावरांना पावसाळ्यापूर्वी घटसर्प, एकटांग्या, लाळ्याखुरकुत रोगाचे तसेच शेळ्यांना पी. पी. आर. चे लसीकरण करावे.
- ❖ पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी चारा पिकांची पेरणी करावयास सुरुवात करावी. कमी पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी ज्वारी व बाजरी यासारखी हंगामी चारा पिके तसेच मध्यम पावसाच्या ठिकाणी मका व ज्या ठिकाणी पाण्याचा योग्य निचरा होईल, अशा भागात बहुवार्षिक चारा पिके घ्यावीत. विशेषत: संकरीत नेपियर या चारा पिकांची पेरणी करावी.
- ❖ पावसाळ्यापूर्वी गोठ्याची डागडूजी तसेच अंतर्गत स्वच्छता करावी. गोठ्याभोवती पाणी साचणार नाही, यासाठीच्या उपाययोजना कराव्यात.
- ❖ पावसाळ्यात गोचीड, गोमाशा आणि इतर परजीवींचे नियंत्रण करावे.
- ❖ वादळी पावसाचे दिवस असल्याने जनावरांचे रक्षणासाठी नियोजन करावे. उच्च दाबाच्या विजेच्या तारा व वादळी विजेपासून बचावासाठी उपाय करावे.
- ❖ पोल्ट्री फार्म तसेच खुराड्यातील अमोनियात वाढ होणार नाही, याची पक्षीपालकांनी काळजी घ्यावी.


**जुलै**


- ❖ खेड्यापाड्यातील पाणीटंचाईमुळे चाराटंचाईचे संकट निर्माण होते. त्याचा परिणाम जनावरांच्या स्वास्थ्यावर व दुध उत्पादन क्षमतेवर होतो. अशा प्रतिकुल परिस्थीतीत जनावरांची प्रतिकारशक्ती मंदावते आणि विविध रोगांच्या साथी ऐन पावसाळ्याच्या प्रारंभी उद्भवतात.
- ❖ ग्रामीण भागात जनावरांना पावसापासून पुरेसे संरक्षण न मिळणे, गोठ्यातील अस्वच्छता या सर्वांची भर पडून अनेक रोगांचा प्रादुर्भाव प्रामुख्याने पावसाळयात होतो. यातील बरेचसे रोग हे संसर्गजन्य असतात.
- ❖ पावसाळ्यात घटसर्प, फऱ्या/एकटांग्या, आंत्रविषार, तिवा इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून येतो.
- ❖ रोग प्रतिबंध करण्याकरीता सर्व जनावरांना जवळच्या पशुवैद्यकिय दवाखान्यातून प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. गोठे स्वच्छ ठेवावेत, चिखल होऊ देऊ नये.
- ❖ साथीच्या रोगाची शंका आल्यास नजीकच्या पशुवैद्यकास कल्पना देऊन आजारी जनावरांना वेगळे बांधावे.



मे महिन्यात राज्यात सर्वत्र जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे माळरानाने हिरवीगार मखमल परिधान केली असून, पशुधनाला माळरानावर चरावयास सोडण्यास पशुपालकांनी सुरुवात केली आहे, तर दुसरीकडे शेतीच्या पेरणीपुर्व मशागतीत बळीराजा मग्न असून, उपलब्ध पशुधनाच्या सहाय्याने खरीपातील कामे आटोपण्यास त्याने सुरुवात केली आहे.

**छायाचित्र साभार: सोशल मिडिया**






# पशुसंवर्धन दिनानिमित्त राज्यभरात ३७१२ शिबिरांचे आयोजन

## २,२५,८९५ पशुंवर उपचार, १,११,४०४ पशुपालकांना मार्गदर्शन

पशुसंवर्धन विभागाच्या १३३ व्या स्थापना दिवसानिमित्त राज्यभरात विविध ठिकाणी पशुपालक संवाद व पशुउपचार शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांना पशुपालक-शेतकरी बांधवांचा उत्तम प्रतिसाद लाभला. राज्यभरात एकूण ३७१२ शिबिरांचे आयोजन करण्यात आले, ज्यात २ लाख २५ हजार ८९५ पशुंचे रोगनिदान व उपचार करण्यात आले. या शिबिरांतर्गत एकूण १ लाख ११ हजार ४०४ पशुपालकांना विभागाच्या विविध योजना, उपक्रम, रोग नियंत्रण, पशुसंवर्धन व्यवसाय व्यवस्थापन व प्रशिक्षण याबाबत पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी मार्गदर्शन केले.

पशुसंवर्धन विभागाने आपल्या १३३ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीत संशोधन, प्रशिक्षण, पशुसंवर्धन व्यवसाय व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान, रोगनियंत्रण आदींच्या माध्यमातून पशुपालकांना सहाय्यक ठरेल असे कार्य केले आहे. विभागाचा हा नावलौकीक आणखी उंचावण्यासाठी यापुढील काळातही पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाने आपल्या समर्पित सेवा विभागाच्या गौरववृद्धीसाठी समर्पित कराव्यात, असे आवाहन यानिमित्ताने आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा. प्र.से.) यांनी केले.

पशुसंवर्धन विभागाच्या १३३ व्या स्थापना दिनानिमित्त राज्यभरात विभागनिहाय खालीलप्रमाणे शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते,

| विभागाचे नाव | शिबिरांची संख्या | उपचार केलेल्या पशुधनाची संख्या | मार्गदर्शन केलेल्या पशुपालकांची संख्या |
|---|---|---|---|
| अमरावती | ७०२ | ४४६२४ | २७२६६ |
| लातूर | ४१२ | ११८९२ | ८२०० |
| नाशिक | ५३९ | ४०९९६ | २०५८४ |
| छ. सं.नगर | ३७७ | १५३४८ | १२६२४ |
| मुंबई | ३४१ | ११४५६ | ६४१२ |
| पुणे | ८२५ | ६०१८७ | २३५८२ |
| नागपुर | ५१६ | ४१३९० | १२७३६ |
| एकूण | ३७१२ | २२५८९५ | १११४०४ |











# गोसंवाद




संकल्पना



डॉ. दर्शन नितीन काकडे
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी- १
लोणंद, ता. खंडाळा
जि. सातारा

# पावसाळ्यातील पशुधनाचे आजार व नियंत्रण



- पशुपालकांनी करावयाची पुर्वतयारी
- पशुंच्या चाऱ्याबाबत करावयाची पूर्वतयारी
- पशुंचे आरोग्य चांगले राहावे यासाठी घ्यावयाची काळजी
- घटसर्प रोग व प्रतिबंधात्मक उपाय
- फऱ्या किंवा एकटांग्या रोगाची बाधा
- लंपी चर्मरोग व उपाययोजना
- शेळी-मेंढी पालकांनी घ्यावयाची काळजी
- कुक्कुट पक्ष्यांची पावसाळ्यात घ्यावयाची काळजी
- मृत पशुंची विल्हेवाट



डॉ. भगतसिंग कदम
सहाय्यक आयुक्त,रोगनियंत्रण, पसं-१२,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

हवामानातील बदलामुळे पाऊस पडण्याच्या पारंपारीक पद्धतीवर परिणाम होत आहे. काही भागात चक्रीवादळ होतात तर काही भागात अतिवृष्टी, पूर येतो. तसेच, काही भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. हवामानातील बदलामुळे पाऊस पडण्याच्या कालावधी व प्रमाण यावर परिणाम होत आहे. यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाली. अचानक झालेल्या या बदलामुळे चारा पिकांच्या उत्पादनावर परिणाम होतो व चाराटंचाई निर्माण होते, तसेच निर्माण झालेल्या चाऱ्याची गुणवत्ताही कमी असते. याबरोबरच रोगजंतूंना पोषक वातावरण मिळाल्यामुळे रोग प्रादुर्भावाची शक्यता वाढते, त्यावेळी अतिवृष्टी, पूर यामुळे पशुधनाचे मृत्यू होतात. या सर्वांचा परिणाम म्हणून दूध उत्पादन, मांस, अंडी उत्पादनात घट होते. तसेच, जनावरांच्या प्रजनन क्षमतेवरही विपरीत परिणाम होतो.

**पशुपालकांनी करावयाची पूर्वतयारी**

पावसाळ्यापुर्वी पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी पशुंचा निवारा, चारा, पाणी व आरोग्य या बाबींवर लक्ष केंद्रित करावे. गोठ्याचा विचार करता पशुधन ठेवलेल्या ठिकाणाचा / गोठ्याच्या स्थितीचा ...... पशुधनाच्या आरोग्यावर फार मोठा परिणाम होत असतो. आपल्या पशुधनासाठी गोठा तयार नसेल तर किंवा तो अपुरा असेल, तर तो आपण तयार केला पाहिजे. गोठ्याच्या छताची डागडुजी करून पाणी गळती बंद केली पाहिजे. पशुंना कोरड्या जागेवर ठेवणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. गोठ्याची जागा निवडताना शक्यतो उंचीवर व कोरड्या ठिकाणी पाण्याच्या निचरा होणाऱ्या आणि पूर पट्ट्यात येत नसलेल्या भागांमध्ये केली पाहिजे. गोठ्यात ओलसरपणा असल्यास रोगजंतूची वाढ होते आणि पशुधनाच्या आरोग्यास हानी पोहोचू शकते, विशेषतः स्तनदाह होऊ शकतो. पशुंना कोरडी जागा नसेल, तर ती जनावरे जास्त वेळ उभा राहतात. त्यामुळे त्यांच्या शरीरावर ताण येतो तसेच रवंथ करण्याची प्रक्रिया कमी होऊन अन्नपचन नीट होत नाही. पशुंना पावसाळ्याच्या वातावरणामध्ये जमीन थंड पडत असल्यामुळे त्याला आपण भाताचे तूस / वाया गेलेला चारा याच्यापासून गोठ्यात गादी तयार केली पाहिजे. पावसाळ्यामध्ये गोठयाभोवती पाणी साचणार नाही अशा पद्धतीने

चर काढून ठेवली पाहिजे. गोठ्याच्या आजूबाजूला असलेले खड्डे उंदीर घुशींची बिळे आपण बंद करून घेतली पाहिजेत.

गोठ्याच्या आजूबाजूस असलेल्या झाडाच्या फांद्या गोठ्यावर पडण्याची शक्यता असल्याने अशा फांद्या छाटाव्यात. गोठ्यास आतून व बाहेरून चुन्याने रंगवावे. जनावरांचे गोठे पूर्णपणे बंदिस्त करता येतील यासाठी उपाययोजना केल्या पाहिजे. गोठ्यातील विद्युत पुरवठा सुरक्षित व सुरळीत असला पाहिजे. आजूबाजूचे गवत झाडेझुडपे काढून तो परिसर स्वच्छ केला पाहिजे. गोठा उबदार राहावा यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

### पशुंच्या चाऱ्याबाबत करावयाची पूर्वतयारी

पशुंच्या आहारामध्ये कोरडा चारा, ओला चारा व पशुखाद्य या तीन बाबींचा समावेश असतो. पशुपालकाने आपल्या पशुधनाच्या प्रमाणात किमान चार महिन्याचा कोरडा चारा साठवला पाहिजे. उदाहरणार्थ एका शेतकऱ्याकडे पाच दुभत्या गायी असतील तर त्यांना रोज सुमारे ५० किलो कोरडा चारा लागेल. म्हणून, चार महिन्याकरता किमान सहा टन कोरडा चारा साठवला पाहिजे. पावसाळ्यामध्ये जनावरांना हिरवा चारा देताना विशेष काळजी घेतली पाहिजे. गवताबरोबर काही विषारी वनस्पतीही वाढण्यास सुरुवात होते. तसेच कोवळ्या चाऱ्यांमध्ये एचसी एन, नायट्रेट यासारखे विषारी घटक असतात व पशुंच्या ते खाण्यात आल्यावर त्यांना विषबाधा होऊन पशुंचा मृत्यू होऊ शकतो.

चरताना किंवा कापून आणून जनावरांना देताना विषारी वनस्पती वेगळ्या करणेही अशक्य असते. या कोवळ्या चाऱ्यात पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने अपचन होऊन जनावरांना हगवण लागू शकते. पावसाळ्याच्या सुरुवातीस जनावरांना चरावयास सोडलेस या वनस्पती अपघाताने खाण्याची शक्यता असल्याने त्यांना चरावयास सोडू नये. पावसाळ्यामध्ये ओला चारा कापून आणणे व त्याची साठवण करणे फार त्रासदायक असते, याकरिता पशुपालकांनी मुरघासाचा वापर सुरू केल्यास पशुधन आणि पशुपालक दोघांनाही फायदेशीर होईल. चांगल्या प्रतीचा मुरघास योग्य पद्धतीने साठवण करून तो योग्य प्रमाणात दिला, तर पशुंचे दुग्धोत्पादन वाढेल व आरोग्यही उत्तम राहिल. चारा कोणत्याही प्रकारचा असला तरी तो बुरशीयुक्त नसावा. बुरशीयुक्त चारा, खाद्य खाल्ल्यास पशुंच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, काही वेळा पशुंचा मृत्यूही होतो. पशुंना देण्यात येणारे पशुखाद्य कोरड्या जागेत साठवले पाहिजे. ते जमिनीवर थेट न ठेवता थोड्या उंचीवर लाकडी फळ्यावर व भिंतीपासून थोड्या अंतरावर ठेवावे जेणेकरून ते ओले होणार नाही. पावसाळ्यात शक्यतो आवश्यकतेपेक्षा जास्त पशुखाद्याचा साठा करून ठेवू नये.

पावसाळ्यात पशुंना उन्हाळ्याच्या तुलनेत कमी पाणी लागत असते. परंतु, दिले जाणारे पाणी स्वच्छ असावे आणि ते थंड नसावे. साचलेले पाणी कधीही जनावरांना देऊ नये. साचलेल्या पाण्यात अनेक प्रकारचे रोगजंतू असतात व हगवण, तसेच निमोनिया यासारखे आजार पशुधनास होऊ शकतात. शक्यतो पशुंना बोअरवेलचे ताजे गोडे पाणी द्यावे. आवश्यकता असल्यास त्यावर क्लोरीनेशन प्रक्रिया करावी.

### पावसाळ्यात पशुंचे आरोग्य चांगले राहावे यासाठी घ्यावयाची काळजी:

पावसाळ्यापुर्वी सर्व पशुधनाचे पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार जंत निर्मूलन करावे. जंतनिर्मुलन केल्याने पशुंचे आरोग्य सुधारते, तसेच त्यांच्यामध्ये चांगली रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते. पावसाळ्यात रोगजंतूसाठी पोषक वातावरण तयार होत असल्याने घटसर्प, फऱ्या यासारख्या रोगांची साथ येते. तसेच गोचीड, गोमाशी, डास, पिसवा यांचे प्रमाण वाढते. त्यामुळे त्यांच्या चाव्याद्वारे पसरणाऱ्या आजारांचा, विशेषतः लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव होतो. या विविध रोगांच्या साथींचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून रोगप्रतिबंधक लसीकरण केले गेले पाहिजे. लसीकरण करताना ते साथीच्या संभाव्य कालावधीच्या किमान २१ दिवस अगोदर केले पाहिजे.

### मृत पशुंची विल्हेवाट:

अतिवृष्टी, तसेच पूर परिस्थिती निर्माण झालेल्या पशुधनांमध्ये मरतूक होण्याची शक्यता असते. मृत पशुधनाची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली गेली नाही, तर ते मानवी आरोग्यास तसेच पशुधनाच्या आरोग्यासही धोकादाय क ठरू शकते. मृत पशुंचा नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झाल्यास त्याचा पंचनामा करावा. शवविच्छेदन करून त्याच्या कानातील बिल्ला जतन करून ठेवावा आणि पशुवैद्यकांकडून त्यांचा मूल्यांकनाचा दाखला घेऊन नैसर्गिक आपत्तीकरिता असलेल्या निकषांद्वारे मदत मिळणे करता महसूल विभागाकडे अर्ज करावा. पशुधनाच्या मृतदेहाची विल्हेवाट मनुष्यवस्तीपासून दूर लावावी. सदर जागा विहीर, नाला, ओढा, नदी, धरणाचे पाणी यांचेपासून पाचशे फूट दूर अंतरावर असावी. मोठ्या पशुंसाठी ८ फूट खोल, ८ फूट लांब आणि ६ फूट खोल खड्डा खोदून, त्याचे तळाशी चुन्याचा किमान एक इंचाचा थर द्यावा. मृत जनावर त्यावर ठेवून त्यावर पुन्हा चुन्याचा थर द्यावा. खड्डा बुजविताना मृत पशुधनाच्यावर मातीचा किमान तीन फुटाचा थर असावा. त्या ठिकाणी काट्यांचे तात्पुरते कुंपण करावे व त्या परिसराचे निर्जंतुकीकरण करून घ्यावे; जेणेकरून जंतूचा प्रसार थांबवला जाईल.

शासनामार्फत विविध लसीकरण मोहीम राबवल्या जात असून, केंद्र शासनाच्या पशुआरोग्य व रोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुंच्या गंभीर आजारावर तसेच लाळखुरकत, सांसर्गिक गर्भपात, शेळ्या-मेंढ्यातील पीपीआररोग प्रतिबंधक लसीकरण मोहीमा कालबद्ध पद्धतीने राबविल्या जात आहेत. पशुपालकाने आपल्या पशुधनास या मोहिमेअंतर्गत लसीकरण केले पाहिजे. वारंवार केलेल्या लसीकरणामुळे देशातील रोग प्रादुर्भाव कमी होतात. काही रोगांचे निर्मूलन करणे शक्य होते आणि पशुधन निरोगी राहून पशुपालकांचे नुकसान टळते.

**घटसर्प रोग व प्रतिबंधात्मक उपाय:**

घटसर्प / गळासूज हा आजार एक जिवाणूजन्य आजार असून, तो प्रामुख्याने म्हशींना होतो. गाय, शेळ्या-मेंढ्या व वराहातही तो आढळून येतो. घटसर्प या रोगाचे जिवाणू प्राण्यांच्या श्वसनसंस्थेत वास्तव्यात असतात, परंतु वातावरणातील अचानक बदल, जास्त दूध उत्पादनामुळे शरीरावर आलेला ताण यामुळे या रोगाचे जंतू डोके वर काढतात व आजार पसरवतात. जिवाणू गढूळ पाणी, दूषित चारा याद्वारेही पशुच्या शरीरात प्रवेश करतात. रोगाची बाधा झालेल्या पशुंना एकदम जास्त ताप येतो. कधी कधी हा ताप १०६ ते १०७ डिग्री फॅरनाईटपर्यंत असतो. जनावराचे डोळे लाल होतात, जनावरे थरथर कापतात आणि काही वेळातच तात्काळ मरण पावतात. काही पशुंच्या नाकातोंडातून स्त्राव वाहू लागतो, घशाला सूज येते, श्वसनास त्रास होतो व घरघर असा आवाज येतो. प्रतिजैवकांचा तात्काळ वापर केल्यास पशु बरा होऊ शकतो परंतु बहुतांश वेळा उपचारास कमी संधी मिळते. अतिवृष्टी, पूर परिस्थितीमध्ये या रोगाच्या साथी वारंवार आढळून येत असतात.

**फऱ्या किंवा एकटांग्या रोगाची बाधा**

फऱ्या रोग क्लोस्ट्रीडीयम प्रकारच्या जंतूंमुळे, प्रामुख्याने गोवंशीय पशुधनास होणारा आजार आहे. जिवाणू जखमेद्वारे दूषित चारा व पाणी याद्वारे / बाधित जनावराचे संपर्कात आल्याने होतो. लहान वासरे व धष्ठपुष्ठ जनावरांना याची जास्त बाधा होते. फऱ्या रोग झाल्यास जनावरांना तीव्र ताप येतो, मांडीवर व पाठीवर सूज येते. हा सुजलेला भाग दाबल्यास चरचर आवाज येतो. कारण या भागांमध्ये वायू जमा झालेला असतो. पायास सूज आलेने जनावर एका पायावर उभे राहते, लंगडते व वेळीच उपचार न झाल्यास पशुचा मृत्यू होतो. काही वेळा सुजीवर काप देऊन त्यामध्ये प्रतिजैवकांचा वापर केल्यास जनावरे वाचू शकतात, पण अशी जनावरे शेतीच्या कामासाठी फारशी उपयोगी राहत नाहीत.



### लंपी चर्मरोग व उपाययोजना

लंपी चर्मरोग हा देवी वर्गातील विषाणूपासून प्रामुख्याने गायवर्गीय पशुंना होणारा आजार असून, दोन वर्षांपूर्वी राज्यात सुमारे ३० हजार पशुंचा या रोगाने मृत्यू झाला होता आणि सुमारे दोन लाख इतके पशु बाधित झाले होते. या आजाराचा प्रसार बाधित जनावरांशी नजीकचा संपर्क, जनावरांच्या नाका तोंडातील स्त्राव, दुषित चारा पाणी, भांडी, गोचीड व डास, माशा यांच्यामार्फत होत असतो. गेले तीन वर्षे राज्यात राबवलेल्या लसीकरण मोहिमेमुळे गतवर्षी फक्त आठ ठिकाणी तुरळक प्रमाणात या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. परंतु, हा रोग पुन्हा डोके वर काढू शकतो म्हणून आपणास राज्यातील १.३९ कोटी गोवर्गीय पशुधना स १०० टक्के लसीकरण करायचे असून, १५ जून अखेर राज्यात ७७ लक्ष पशुंना लसीकरण केले गेले आहे. पशुपालक बांधवांनी आपल्या सर्व गायी, बैलांना आणि चार महिन्यावरील वासरांना लंपी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण केले पाहिजे. या आजारामुळे मोठ्या प्रमाणावर पशुंचे मृत्यू होऊन पशुपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या आजारात पशुंच्या अंगावर एक ते पाच सेंटीमीटर व्यासाच्या गाठी येतात. काहीवेळा गाठी तोंडातील आतील भाग श्वासनलिका या ठिकाणीही येतात. या गाठीचे अल्सर तयार होतात. काही वेळा जंतुसंसर्ग होऊन जनावरांचा मृत्यू होतो. या आजारात जनावर आजारी पडल्यानंतर बराच कालावधी ते चारा खात नाही आणि त्यांना पुर्ववत होण्यासही खूप कालावधी लागत असतो. त्यामुळे पशुपालकाचे श्रम व् आर्थिक नुकसान फार मोठ्या प्रमाणात होत असते. म्हणून या रोगाचे निर्मलून होणे गरजेचे आहे.



### कुक्कुट पक्ष्यांची घ्यावयाची काळजी:

राज्यामध्ये २ कोटी परसातील तर ५.५ कोटी व्यावसायिक कुक्कुटपक्षी आहेत. पावसाळा ऋतू कुक्कुटपालकांसाठी आव्हानात्मक असतो. हवेतील वाढलेल्या दमटपणामुळे कुक्कुट खाद्याचा दर्जा खालावू शकतो व पक्ष्यांच्या रोगप्रतिकारक क्षमतेवर परिणाम होऊन रोगाचे प्रमाण वाढते. पावसाळ्यापुर्वी पक्षीघराची डागडुजी करुन आजूबाजूची झाडे-झुडपे काढावीत. पावसाचे पाणी शेडमध्ये येणार नाही तसेच आजूबाजूला साठणार नाही, याची दक्षता घ्यावी. पोल्ट्री फार्ममधील गाद्यांचे तूस बदलून घ्यावे व त्यातील ओलावा कमी करण्यासाठी चुन्याची फक्की मिसळावी. शेडमधील आर्द्रता वाढली तर अमोनियाचे प्रमाण वाढते व पक्षी श्वसनसंस्थेच्या आजारास बळी पडतात. त्यांना जंतनाशक देणे गरजेचे आहे. बर्ड फ्लू रोगाचा धोका लक्षात घेता परसातील कुक्कुटपक्ष्यांचे खाद्य वन्य पक्षी खाणार नाहीत किंवा वन्य पक्ष्याने खाल्लेले खाद्य परसातील कुक्कुटपक्षी खाणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

### शेळी-मेंढी पालकांनी घ्यावयाची काळजी:

राज्यात सुमारे १.३२ कोटी शेळ्या-मेंढ्या आहेत. राज्यातील मेंढपाळ बंधूंचे शेळ्या-मेंढ्यांसह पावसाळ्यात जास्त पावसाच्या प्रदेशाकडून कमी पावसाच्या प्रदेशाकडे स्थलांतर होत असते. या स्थलांतरणाच्या दरम्यान त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. पाऊस, पूर, थंड वारे आणि सतत चालत राहणे, यामुळे शेळ्या-मेंढ्यांवर फार मोठ्या प्रमाणावर ताण आलेला असतो. प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेक शेळ्या-मेंढ्यांचा विशेषतः पिल्लांचा मृत्यू होतो. दूषित पाणी पिल्याने हगवण घटसर्प यासारखे आजार होतात. तर पावसाळ्याच्या सुरुवातीस कोवळे गवत खाल्ल्याने आंत्रविषार नावाचा रोग होतो. उन्हाळ्यामध्ये शेळ्या-मेंढ्यांची पचनसंस्था सुक्या चाऱ्याच्या पचनासाठी समायोजित झालेली असते. अचानक हिरवा चारा खाण्यात आल्याने आतड्यातील क्लोस्ट्रीडियम प्रकारच्या जंतूची वाढ सुरु होते व त्यातून निर्माण झालेल्या विषारी घटकामुळे शेळ्या-मेंढ्या गोल फिरणे, ओरडणे, हगवण अशी लक्षणे दाखवितात व त्यांचा तात्काळ मृत्यू होतो. हा रोग होऊ नये म्हणून पावसाळ्यापूर्वी मेंढ्यांना आंत्रविषार प्रतिबंधक लसीकरण करणे गरजेचे आहे. बुस्टर डोससह शेळ्या राज्यातील तिन्ही ऋतूंमधील रोग प्रादुर्भावांचा अभ्यास करून महाराष्ट्र शासनाने पशुधनातील लसीकरणाचे वेळापत्रक तयार केले असून, त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या लसी व लसीकरणास आवश्यक यांचा पुरवठा दवाखान्यात केला जातो. शेळी व मेंढी पालकांनी या सुविधांचा लाभ घेणे रोगप्रतिबंधासाठी अत्यंत आवश्यक आहे.

# नॅनोतंत्रज्ञानाची क्रांती: प्रतिजैविक प्रतिकारशक्तीविरुद्ध नवा आशावाद






**डॉ. सुजाता गजानन भटकर**
Young Professional-II,
ICAR-SCSP Project
पशुवैद्यकीय आणि प्राणी विज्ञान महाविद्यालय, अकोला

प्रतिजैविक प्रतिरोध जागतिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. यासाठी विविध क्षेत्रांमध्ये समन्वित प्रयत्न आवश्यक आहेत. जबाबदार प्रतिजैविक वापर प्रोत्साहित करून आणि संशोधनात गुंतवणूक करून प्रतिकारशक्तीचा प्रभाव कमी करता येईल.

- ❖ प्रतिकारक सूक्ष्मजंतूंना "सुपरबग्स" असे म्हणतात.
- ❖ हा प्रतिकार त्यांच्या अंतर्निहित उत्क्रांतीशील स्वभावामुळे विकसित होतो.
- ❖ विविध वातावरणात सहज आणि जलद जुळवून घेण्याची क्षमता.
- ❖ प्रतिजैविकांचा गैरवापर आणि अति वापर यामुळेही हा प्रतिकार वाढतो.

नॅनोपार्टिकल्स अडथळे पार करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय देतात. नॅनो-स्ट्रक्चर्ड मटेरियल्स प्रतिजैविके पोहोचवतात, औषध वितरणात मदत करतात किंवा स्वतः प्रतिजैविक क्रिया करता NPs रोगकारक सूक्ष्मजीवांच्या पेशींच्या पडद्यामध्ये प्रवेश करून महत्त्वाच्या आण्विक मार्गांमध्ये हस्तक्षेप करतात, ज्यामुळे अनोखी प्रतिजैविक यंत्रणा तयार होते. योग्य प्रतिजैविकांसोबत, NPs समन्वय दाखवतात.

### नॅनोपार्टिकल (NP)

- ❖ **नॅनो-स्ट्रक्चर्ड मटेरियल्स:** हे प्रतिजैविके पोहोचवतात, नवीन औषध वितरणास मदत करतात किंवा स्वतःमध्ये प्रतिजैविक क्रिया दाखवू शकतात.
- ❖ **नॅनोपार्टिकल्स:** उपनॅनो आकारातील कोलॉइडल औषध वितरण प्रणाली
- ❖ **नवीन प्रतिजैविक घटक:**"नॅनोबायोटिक्स"
- ❖ **कणाचा आकार:** व्यास १०-१००० नॅनोमीटर असतो.
- ❖ हे सिंथेटिक / अर्ध-सिंथेटिक पॉलिमरपासून बनवलेले असतात, जे औषधे / प्रथिनयुक्त पदार्थ वाहून नेतात.
- ❖ **नॅनोथेरॅनॉस्टिक्सची क्षमता:** नवीन औषध वितरण प्रणाली
- ❖ त्यांची विषारीता कमी करतात
- ❖ सेलमध्ये सुरक्षितपणे प्रवेश व पर्यावरणात सुरक्षितपणे सोडणे शक्य होते.
- ❖ कोटिंग्स आणि ब्रशेसमध्ये पॉलिथिलीन ग्लायकॉल (PEG), चिटोसान आणि पॉलिॲक्रिलिक ॲसिड (PAA) यांचा समावेश होतो.

### ग्रीन मेटल नॅनोपार्टिकल्स (GMNPs)

- ❖ खनिजांचे पुनर्वापर करून GMNPs चे संश्लेषण कमी खर्चिक आणि पर्यावरणपूरक त्यांच्या गुणधर्मांना अधिक सुरक्षितपणे वाढवणे.
- ❖ पुनर्वापरित धातूंच्या साहाय्याने GMNPs केमिकल्सशिवाय कमी कालावधीत, म्हणजेच ३३ तासांपेक्षा कमी वेळेत तयार करता येतात.
- ❖ हे खनिज वेगवेगळ्या सांद्रतेत पावडर आणि द्रव स्वरूपात रूपांतरित केले जातात, ज्यामुळे नॅनो-गोल्ड आणि नॅनो-सिल्व्हर तयार होते.

### कार्यपद्धती

**१. थेट जंतुनाशक क्रिया:** सिल्व्हर नॅनोपार्टिकल्स बॅक्टेरियाच्या झिल्लीला बाधा आणतात,ऑक्सिडेटिव्ह तणाव निर्माण करतात आणि DNA प्रतिकृतीकरणात अडथळा आणतात, ज्यामुळे जंतू मरतात.

**२.प्रतिजैविक वितरणात सुधारणा:** नॅनोपार्टिकल्स पारंपारिक प्रतिजैविकांचे वाहक म्हणून वापरले जातात, औषधाची स्थिरता, विद्राव्यता आणि लक्ष्यित वितरण सुधारतात, ज्यामुळे डोस कमी होतो.

३. **प्रतिकारशक्ती तंत्रांवर मात:** हे कण इफ्लक्स पंप रोखतात, बायोफिल्म नष्ट करतात आणि प्रतिजैविकांच्या कार्यक्षमतेत वाढ करतात.

४.**समन्वयित परिणाम:** नॅनोकण आणि पारंपारिक प्रतिजैविकांचा एकत्रित वापर जंतुनाशक परिणाम वाढवतो आणि प्रतिरोधकता कमी करतो.

### विशिष्ट उदाहरणे:

- **सिल्व्हर नॅनोकण (AgNPs):** विविध बहुप्रतिरोधक बॅक्टेरिया आणि बुरशींवर प्रभावी.


- **झिंक ऑक्साइड नॅनोकण** (ZnO NPs) **:** स्वतःमध्ये जंतुनाशक गुणधर्म असून, टेट्रासायक्लिनसारख्या प्रतिजैविकांची कार्यक्षमता वाढवतात.
- **गोल्ड नॅनोकण** (AuNPs)**:** काही बॅक्टेरियावर प्रभावी, प्रतिजैविक व लसींच्या कार्यक्षमतेत वाढ.
- **कॉपर नॅनोकण** (CuNPs)**:** दोन्ही प्रकारच्या बॅक्टेरियावर (Gram-positive, Gram-negative) प्रभावी; पशुपालनात वापराचा अभ्यास सुरू.

**प्राणी आरोग्यातील फायदे:**

- ❖ प्रतिजैविकांवरील अवलंबित्व कमी होते.
- ❖ संसर्गावर प्रभावी नियंत्रण मिळवून प्राण्यांचे आरोग्य आणि उत्पादकता वाढते.
- ❖ झूनोटिक (प्राण्यांकडून माणसात पसरणारे) रोगांचा धोका कमी होतो.
- ❖ अँटीबायोटिक्सची संख्या आणि सांद्रता कमी करणे
- ❖ औषधांची विघटनाविरुद्ध स्थिरता वाढवणे
- ❖ अँटीबायोटिकमुळे होणारे प्रतिक्रियाशील ऑक्सिजन प्रजाती (ROS) कमी करून सस्तन प्राणी पेशींवरील विषारीपणा कमी करणे.
- ❖ अँटीबायोटिकचे रूपांतरण कमी करणे
- ❖ ऊतींमध्ये लक्ष्यित औषध वितरणाचा कालावधी वाढवणे आणि नियंत्रण ठेवणे.
- ❖ औषधांच्या स्थिरतेत वाढ आणि लक्ष्यित वितरणामुळे उपचाराचा प्रभाव वाढवणे

**आव्हाने**

- ❑ विषारीपणा आणि पर्यावरणावर परिणाम:
- ❑ नॅनोकणांचे प्राण्यांवर व पर्यावरणावर संभाव्य दुष्परिणाम तपासणे आवश्यक आहे.




**नियम आणि परवाने**

- ➢ वापरासाठी नियामक मंजुरी आवश्यक.
- ➢ खर्च व कार्यक्षमतेचा विचार:
- ➢ उत्पादन व वापराचा खर्च व्यावहारिक असावा.
- ➢ प्रमाणबद्धता व गुणवत्ता नियंत्रण
- ➢ नॅनोकणांची निर्मिती आणि तपासणीसाठी प्रमाणित पद्धती आवश्यक आहेत.

नॅनोटेक्नॉलॉजीमुळे AMR विरुद्ध लढण्यासाठी शाश्वत व प्रभावी उपाय मिळू शकतात, पण सुरक्षितता व नियमन यावर अधिक संशोधन गरजेचे आहे.

वरुणराजाच्या जलाभिषेकात ग्रीष्माच्या रखरखावात तापलेल्या मातीला अत्तरगंध प्राप्त झाला अन् माती पुरणासारखी मऊशार झाली. आभाळकेसरीच्या दर्शनाने वाफसा मिळाल्याने ग्रामीण महाराष्ट्रात खरीपातील पेरणीचा उत्सव माळशिवारात भरला आहे. मातीआड बीज करून आभाळाच्या कृपेवर जोंधळाची स्वप्न पाहणाऱ्या बळीराजाशी कृषीसेवेत समर्पित होणाऱ्या सर्जा-राजाचे नाते अतूट असल्याचे हे बोलके छायाचित्र



पुण्यश्लोक सत्यमेव जयते

# शेळी व मेंढी पालन प्रशिक्षण माहिती

राज्यामध्ये शेळी-मेंढीपालन व्यवसाय हा प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये केला जातो. शेळ्या-मेंढ्यांच्या मांसाचे वाढते भाव, त्यामुळे उपलब्ध होणारी खात्रीची बाजारपेठ, एकापेक्षा अधिक करडे देण्याची क्षमता, इतर रवंथ करण्याऱ्या जनावरांपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या लवकर वयात येणे आणि वजनास येण्याची क्षमता इ. बाबींमुळे सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवती शेतकरी या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहेत. शासन, बँका, विविध समाज विकास महामंडळ व शासकीय विभाग हे विविध योजनातंर्गत कर्ज आणि अर्थसहाय्य देत असतात. शेळी-मेंढीपालन व्यवसाय सुरु करताना नवनवीन तंत्रज्ञान तसेच या व्यवसायासंबंधी तांत्रिक माहिती उपलब्ध होऊन, सदरचा व्यवसाय फायदेशीर व्हावा, याकरिता विविध वित्तिय संस्था व्यवसायला कर्ज देताना "शेळी-मेंढीपालन प्रशिक्षण" प्रमाणपत्र सादर करण्याची अट घालतात. या सर्व बाबींचा विचार करुन, तसेच कौशल्य विकासाच्या दृष्टीने शेळी-मेंढीपालनाचे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहचवून या व्यवसायाकरिता उपयुक्त करणेकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रांवर व मुख्य कार्यालय, गोखलेनगर पुणे-१६ येथे शेळी-मेंढीपालन व्यवसाय प्रशिक्षण आयोजित करण्यात येते व प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र देण्यात येते.




सदर प्रशिक्षणामध्ये खालीलप्रमाणे माहिती देण्यात येते.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील शेळी व मेंढीपालन व्यवसाय | महाराष्ट्रातील शेळ्या व मेंढ्यांची संख्या, मांसाचे उत्पादन, महाराष्ट्र राज्यातील वधगृह, मांसाची निर्यात, लोकर उत्पादन, दूध उत्पादन. |
| २ | शेळ्या व मेंढ्यांच्या जाती | शेळ्या-मेंढ्यांच्या विभागनिहाय जाती, गुणवैशिष्टये, महाराष्ट्रातील उस्मानाबादी व संगमनेरी शेळ्या तसेच दख्खनी व माडग्याळ मेंढ्यांची गुणवैशिष्टये. |
| ३ | शेळीपालनाच्या पध्दती | मुक्त व्यवस्थापन, मिश्र व्यवस्थापन, ठाणबंद पध्दतीने शेळीपालन याविषयी विस्तृत माहिती |
| ४ | शेळ्यांसाठी निवारा | शेळ्यांच्या वाडे बांधकामासाठी जागेची निवड, गोठ्यांचे प्रकार, वाडेबांधकामासाठी दिशा व वायुविजन |
| ५ | शेळ्यांचा आहार | शेळ्यांच्या आहारात अन्नद्रव्याची गरज (प्रथिने, कार्बोदके, स्निग्ध पदार्थ, पाणी, क्षार व जीवनसत्वे) शेळ्यांच्या आहारातील चारा व पशुखाद्य, करडांचा आहार, प्रजननासाठी वापरण्यात येणाऱ्या बोकडांचा |

सदर प्रशिक्षणामध्ये खालीलप्रमाणे माहिती देण्यात येते.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| | | आहार, गाभण शेळीचा आहार, मुरघास तयार करण्यांच्या पध्दती व फायदे |
| ६ | प्रजनन | शेळ्या-मेंढ्यामधील प्रजनन पध्दती (बाह्य प्रजनन, अंर्तगत प्रजनन, उत्तरोत्तर प्रगती पध्दती, संकरीत प्रजनन), प्रजननाची मुक्त पध्दत, मर्यादित मुक्त पध्दत, नियंत्रित प्रजनन पध्दत, प्रजनन हंगामातील पुर्वतयारी, पैदाशीसाठी शेळ्यांची व बोकडाची निवड, ऋतुकालावधी, कृत्रीम रेतनाद्वारे शेळी सुधारणा, एकाचवेळी शेळ्या माजावर आणावयाच्या पध्दती, प्रजनन हंगाम इ. |
| ७ | करडे व कोकरांचे संगोपन | नवजात करडांचे संगोपन, चिकाचे महत्व, अनाथ करडांचे संगोपन, करडांचे दूध तोडणे, करडांमधील मरतुक, वाढत्या करडांचा दैनंदिन आहार. |
| ८ | शेळ्या-मेंढ्यांचे आजार | आजारी शेळ्यांची लक्षणे, विषाणुमुळे होणारे रोग, जिवांणुमुळे होणारे रोग, बाह्य किटक तसेच परजिवीपासून होणारे आजार. |
| ९ | प्रतिबंधक उपाय | जंतनाशके, किटकनाशके यांचा वापर, लसीकरण, प्रथमोपचार. |
| १० | शेळ्या-मेंढ्यांचा विमा | विम्याची वयोमर्यादा, विमा हमी रक्कम, विमा दर नुकसान भरपाई, विम्याचा दावा करण्याच्या पध्दती |
| ११ | वाहतूक व विक्री | शेळ्या-मेंढ्यांची विक्री किंमत ठरविणे, वाहतुकीमध्ये घ्यावयाची काळजी. |
| १२ | शेळी-मेंढीपालन प्रकल्प अहवाल | प्रकल्प अहवालासोबत करावयाच्या कागद प्रत्राची पुर्तता, करडांचे उत्पादन, मृत्युचे प्रमाण, लेंडी खताचे उत्पादन, दुध उत्पादन, विमा, शेळयांचे औषधउपचार, अनावर्ती खर्च, आवर्ती खर्च, वार्षिक नफा. |
| १३ | प्रक्षेत्रावर ठेवावयाच्या नोंदी | वंशावळ नोंदी, वजन वाढीसंबंधी नोंदी, प्रजनन व जनन नोंदी ई. |
| १४ | शेळ्या-मेंढ्यांकरिता उपयुक्त चारा पिके | या व्यवसायामध्ये अधिक उत्पादन मिळणेसाठी शेळ्या-मेंढ्यांना हिरव्या चाऱ्यांचा सतत पुरवठा होणे आवश्यक आहे. बहुवार्षिक चारा पिकांची माहिती. त्याकरिता मशागत, लागवडीची पद्धत, खत व्यवस्थापन, पाण्या नियोजन, आंतरमशागत, चारा उत्पादन ई. |









**पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या खालील प्रक्षेत्रांवर प्रती प्रशिक्षणार्थी रु. ५००/- इतके शुल्क आकारुन तीन दिवसीय प्रशिक्षण देण्यात येते.**

| अ.क्र. | प्रक्षेत्राचा पत्ता | दूरध्वनी | वेळापत्रक |
|---|---|---|---|
| १ | प्रक्षेत्र बिलाखेड ता. चाळीसगाव, जि. जळगाव | 7028335010 | प्रत्येक महिन्याच्या २३, २४, २५ तारखेस |
| २ | प्रक्षेत्र पडेगांव, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | 9423926271 | प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात |
| ३ | प्रक्षेत्र अंबेजोगाई, जि. बीड | 7738414586 | प्रत्येक महिन्याच्या २५, २६, २७ तारखेस |
| ४ | प्रक्षेत्र मुखेड, जि. नांदेड | 9767018260 | प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात |
| ५ | प्रक्षेत्र महुद, ता. सांगोला, जि. सोलापुर | 9881347842 | प्रत्येक महिन्याचा २ रा व ४ था सोमवार ते बुधवार |
| ६ | प्रक्षेत्र तिर्थ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव | 7738414586 | प्रत्येक महिन्याच्या २५, २६, २७ तारखेस |
| ७ | प्रक्षेत्र दहिवडी, ता. माण, जि. सातारा | 8956928939 | प्रत्येक महिन्याचा दुसरा सोमवार ते बुधवार |
| ८ | प्रक्षेत्र रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली | 8329398369 | प्रत्येक महिन्याचा दुसरा सोमवार ते बुधवार |
| ९ | प्रक्षेत्र पोहरा ता. जि. अमरावती | 9767018260 | प्रत्येक महिन्याच्या २३, २४, २५ तारखेस |
| १० | प्रक्षेत्र बोंद्री, ता. रामटेक, जि. नागपुर | 8799821532 | प्रत्येक महिन्याच्या २३, २४, २५ तारखेस |

**खाली दिलेल्या ठिकाणी दरमहा शेळीपालन प्रशिक्षण घेतले जाते,**
**प्रवेशासाठी संपर्क कार्यालय फोन क्रमांक: ०२०-२५६५७११२ / मो.नं. ८८८८९०२७०**

| अ.क्र. | प्रशिक्षण शुल्क | कालावधी | वेळ | प्रशिक्षणाचे ठिकाण | विषय समाविष्ट |
|---|---|---|---|---|---|
| १ | रु.२०००/- | ३ दिवस | सकाळी १०.३० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत | पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, गोखलेनगर, पुणे - ४११०१६ | ▪ शेळीपालनाची सदस्थिती<br>▪ शेळ्यांच्या जाती, दंतचिकित्सा<br>▪ संगोपन प्रणाली, आहारशास्त्र<br>▪ विविध चारा पिकांची लागवड<br>▪ प्रजनन व्यवस्थापन, कृत्रिम रेतन<br>▪ गोठा व्यवस्थापन पद्धती, विपणन<br>▪ अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल, विमा |

# ग्लॅण्डर्स - अश्वपालकांसाठी एक आव्हान



डॉ. सुनिल लहाने
उपआयुक्त पशुसंवर्धन
रोग अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

ग्लॅण्डर्स हा जिवाणूंपासून होणारा संसर्गजन्य आजार असून अश्ववर्गीय प्राण्यांत गाढव, घोडे व खेचरे यांचेमध्ये आढळतो. हा रोग बुरखोडलेरीया मॅली या सुक्ष्म जिवाणूपासून अश्ववर्गीय प्राण्यांमध्ये होतो. हा रोग प्राचीन असून हिप्पोक्रेटस (इ.स.पूर्व ४५८०) या आधुनिक वैद्यशास्त्राच्या आद्य जनकाच्या लिखाणामध्येही या रोगाचा उल्लेख आढळतो.

अश्व कुळांपैकी गाढवामध्ये हा रोग अतितीव्र स्वरुपात, घोड्यांमध्ये तीव्र व सौम्य स्वरुपात तर खेचरांमध्ये दोन्ही स्वरुपात आढळतो. इतर प्राण्यांपैकी कुत्रा व मांजरे यांना ग्लॅण्डर्स हा रोग होऊ शकतो. गायी-म्हशी, शेळ्या-मेंढ्या, डुकरे या जनावरांत हा रोग आढळत नाही. मात्र, बाधीत जनावरांच्या (घोडयांच्या) संपर्कात येणाऱ्या मनुष्यासही हा रोग होण्याची शक्यता असते.

महाराष्ट्र राज्यात अश्वप्रजातींचा उपयोग प्रामुख्याने विट भट्टी काम, रेती काम, घोडेस्वारी, ओझेवाहू, शेती काम व प्रतिष्ठा या विविध हेतूंकरिता होतो. तसेच राज्यातील प्रसिध्द प्रक्षेणीय स्थळे - माथेरान, पाचगणी व महाबळेश्वर या ठिकाणी घोडयांचा उपयोग यात्रेकरुकरिता वेगवेगळया उंचवटीच्या ठिकाणी जाणेसाठी व राईड करण्यासाठी होतो. गाढवांचा उपयोग राज्यात वीटभट्टी कामात कच्च्या वीटा वाहून नेण्यासाठी, नदीतून अल्प प्रमाणात वाळू वाहण्यासाठी तसेच इंधन, चारा, घरातील वस्तू व शेतमाल वाहण्यासाठी होतो. महाराष्ट्रात मेंढपाळ मेंढयांसह स्थलांतर करत असताना, स्वत:चे घरगुती सामान घोड्यांच्या पाठीवर ठेऊन नेण्यासाठी उपयोगात आणतात.

राज्याच्या सीमेलगतचे अश्वधारक हंगामी शेतमाल वाहण्यासाठी अश्व प्रजातींचा वापर करतात. अश्व प्रजातींचा वापर राज्यातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या जमाती हे करतात व या जमातींची उपजिविका पूर्णपणे अश्व प्रजातीवर अवलंबून आहे.

अश्व प्रजातींमध्ये प्रामुख्याने खुराच्या संबधित आजार जसे कि, लंगडणे व डोळयांचे आजार, कुपोषण, थकवा व पोटसुळ हे आजार आढळतात. तसेच त्यांना सर्रा, धनुर्वात, स्ट्रॅन्गल्स व ग्लॅण्डर्स हया सारख्या नविन आजारांनाही सामोरे जावे लागते. दुष्काळात कमी प्रमाणात चारा उपलब्धतेमुळे त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात.



२० वी पशुगणना - २०१९ नुसार देशात एकूण ५.४४ लक्ष अश्व प्रजातीची जनावरे ( घोडे, गाढव व खेचरे ) आहेत. यापैकी महाराष्ट्रात एकूण ३८ हजाराच्या आसपास अश्व प्रजाती (घोडे, गाढव व खेचरे) आहेत. महाराष्ट्र राज्यात घोडयांची संख्या नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व मुंबई या विभागात आढळते. याचप्रमाणे गाढवांची संख्या पुणे, लातूर, औरंगाबाद, अमरावती आणि नाशिक या प्रशासकीय विभागात प्रामुख्याने आढळते.

**ग्लॅण्डर्स प्रसार -**

ग्लॅण्डर्स या रोगात अश्वजातीय प्राण्यांच्या श्वसन संस्था आणि बाहय कातडीवरील रसग्रंथींना गाठी निर्माण होऊन त्यात पू तयार होतो. बाधीत अश्व प्राण्याच्या नाकातील स्त्राव, चारा, खादय, पिण्याचे पाणी तसेच तबेले, पाण्याची भांडी यात जंतूंचा शिरकाव होतो. दूषित चारा-पाण्यावाटे या रोगाचा संसर्ग इतर घोडयांना होतो. खरारा करण्यांच्या साधनातही बाधीत घोडयाकडून इतर घोडयांना संसर्ग होण्याची शक्यता असते. बाधीत घोडयांकडून माणसांना होणारा संसर्ग प्रामुख्याने मानवी शरीरावरील जखमांद्वारे होतो.

**ग्लॅण्डर्स लक्षणे -**

दुषित चारा-पाण्यावाटे ग्लॅण्डर्सच्या जंतूंचा शिरकाव आतडयामार्गे घोडयांच्या शरीरात होऊन मग हे जंतू रक्तावाटे श्वसनमार्गात त्यातही प्रामुख्याने फुफ्फुसात जाऊन स्थिरावतात. श्वसन नलीका व कातडी येथेही काही प्रमाणात हे जंतू मुक्काम ठोकतात. जंतू स्थिरावलेल्या ठिकाणी प्रथम लहान आकाराच्या गाठी तयार होतात व या गाठींमध्ये यथावकाश पू तयार होतो व गाठी फुटून त्यांचे व्रणात रुपांतर होतो. यातील जंतू मग आजूबाजूच्या



इतर पेशीत पसरतात व तेथे गाठी निर्माण करतात. शेवटी तीव्र स्वरुपाचा फुफ्फुस दाह (न्युमोनिया) होऊन श्वसनक्रियेतील अडथळयांमुळे घोडा मृत्यूमुखी पडतो. गाठी वाढण्याच्या व फुटण्याच्या काळातच जंतू श्वसनसंस्थेतील स्त्रावात मिसळून आजूबाजूचे वातावरण दुषित करतात.

तीव्र स्वरुपाच्या ग्लॅण्डर्स मध्ये खूप ताप येणे, नाकातून प्रथम पातळ व नंतर पू मिश्रीत मधासारखा घट्ट स्त्राव येऊन तो वाढणे, खोकला व श्वसनास अडथळा व दोन तीन दिवसात मृत्यू अशी लक्षणे आढळतात.

सौम्य व दिर्घकालीन ग्लॅण्डर्समध्ये श्वसन संस्थेबरोबर बाहय त्वचा आणि नाकातील अंत:त्वचा बाधीत होतात. बाहय त्वचेवर साधारणपणे एक-दोन सेंटीमीटर आकाराच्या गाठी तयार होतात व फुटतात व व्रणात रुपांतरीत होतात. या व्रणातून काळसर मधाच्या रंगाच्या व जाडीचा स्त्राव वाहू लागतो. कित्येकदा हे व्रण कातडीत खोलवर शिरुन फीस्टयुला निर्माण करतात. कातडी खालील लिंफ ग्रंथीची सूज व त्यातून स्त्राव वाहणे ही लक्षणे दिसतात.

ग्लॅण्डर्समध्ये बाहय त्वचेवरील व्रण प्रामुख्याने मागील पायाच्या आतील बाजूस जास्त प्रमाणात दिसतात. बाहय त्वचेवरील दृष्य स्वरुपाच्या ग्लॅण्डर्सला फार्सी असे दुसरे नांव आहे.

दिर्घकालीन किंवा सौम्य स्वरुपाच्या ग्लॅण्डर्सने बाधीत जनावरे कधीच पूर्णत: बरी होत नाहीत. कालांतरान मृत्यू पावत असली तरी मधल्या काळात जंतू प्रसाराचे काम करतात.

**रोग निदान -:**

या रोगाचे निदानासाठी इलायझा, कॉम्प्लीमेंट फिक्सेशन टेस्ट, पीसीआर अशा खात्रीशीर चाचण्या उपलब्ध आहेत. इलायझा ही घोडयांना क्षेत्रिय स्तरावर तपासण्यांची सोपी व खात्रीलायक पध्दत आहे.

ग्लॅण्डर्सबाबत पक्के निदान झालेनंतर रोग प्रादूर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासनाच्या National Action Plan for Control and Eradication of Glanders in India मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येते. या पथदर्शीय आराखड्यातील मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे :

१. ग्लँडर्स रोगाचा घोडयांपासून मनुष्यास प्रादूर्भाव होण्याची शक्यता असल्याने Prevention and Control of Infectious & Contagious Diseases in Animals-२००९ नुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येते.

२. केंद्र शासनाच्या ग्लॅंडर्स रोगाबाबत करावयाच्या कार्यवाहीसाठी निर्गमित केलेल्या विस्तृत मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्याकरिता प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येते. ही समिती मार्गदर्शक सुचनांनुसार होकारार्थी घोडयांची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे, बाधित भागात सिरो सर्वेक्षण करणे, बाधीत क्षेत्र निर्जतुकीकरण करणे, बाधीत क्षेत्रांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक स्वच्छता व सुरक्षेबाबत अवगत व प्रशिक्षीत करणे, रोग अन्वेषण विभाग, पुणे यांना दैनंदिन अहवाल सादर करणे, इत्यादी कामे करते.

३. तसेच बाधीत क्षेत्रांत व परिसरात केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे सिरो सर्वेक्षण तथा इतर प्रकारचे सर्वेक्षण करण्यात येते.

४. ५० किमी परिसरातील घोडे अथवा इतर अश्व वर्गीय प्राण्यांची वाहतूक (Movement) तात्काळ थांबविण्यांत येते.

५. घोडयांपासून मनुष्यास ग्लॅंडर्सचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने उपरोक्तबाबत कार्यवाही करताना सतत आरोग्य विभागाच्या संपर्कात राहणेबाबत बाधीत क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अवगत करण्यात येते.

६. सदर ग्लॅण्डर्स बाधीत घोडे नष्ट करण्यांसाठी तसेच इतर जैवसुरक्षा उपायांची अंमलबजावणी करणे व सिरो सर्वेक्षण करण्यासाठी रक्तजल नमुने गोळा करणे व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी पशुवैदयकिय अधिकाऱ्यांची / पथकांची नेमणूक करण्यात येते.

७. बाधीत घोडयांच्या तबेल्यातील जागा, पाणी, खाण्याची भांडी, चारा व इतर बाधीत घोडयाच्या संपर्कात असलेल्या सर्व अनुषंगीक गोष्टींचे निर्जतूकीकरण करण्यात येते.

८. बाधीत घोडे/अश्ववर्गीय जनावरांच्या संपर्कात असलेल्या इतर सर्व घोडे / अश्ववर्गीय जनावरांचे रक्तजल नमुने गोळा करुन तात्काळ ग्लॅण्डर्स रोगाच्या तपासणीसाठी पाठविण्यात येते.

९. ग्लॅण्डर्स रोग प्रादूर्भाव उद्भवलेल्या जागेपासून ५ किमी परिघाचे परिसरातील सर्व (१००%) घोडे/अश्ववर्गीय प्राण्यांचे रक्तजल नमुने तपासणीसाठी गोळा करण्यात येतात.

१०. ५-१० किमी परिसरातील घोडे/अश्व वर्गीय प्राण्यांपैकी १००% प्राण्यांचे रक्तजल नमुने गोळा करुन तपासणी करण्यात येतात.

११. रोगप्रादूर्भावाच्या जागेपासून ५० किमी परिघातील परिसरात सर्वेक्षण करण्यात येते.

१२. बाधित क्षेत्रात घोडयांच्या अथवा इतर अश्व वर्गीय जनावरांच्या जत्रा आयोजीत करण्यास बंदी घालण्यात येते.



पशुसंवर्धन विभाग
टोल फ्री क्रमांक :
१८००-२३३-०४१८
राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:



# संकल्प: शुद्ध देशी गोवंश संवर्धनाचा



डॉ. नितीन मार्कंडेय
अशासकीय सदस्य- महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे-६७

**राज्यात देशी गोवंश संवर्धनासाठी आग्रही भूमिका स्वीकृत झाली असून गोवंशास" राज्य माता" दर्जा प्रदान केल्यामुळे अधिक चांगल्या प्रकारे गोवंश जतन आणि विकास साधण्यासाठी सामूहिक प्रयत्न आणि कार्यात्मक पुढाकाराची गरज आहे. यातूनच राज्यात दरवर्षी "शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन" साजरा करण्याची संकल्पना मांडण्यात आली असून महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या शिफारसीनुसार राज्य शासनाने विशेष शासन निर्णय जाहीर केला आहे. निर्णयाबाबत गोसेवा आयोगाची भूमिका, प्रस्ताव, अपेक्षित कार्यपद्धती आणि गोवंश संवर्धनाची दिशा मांडण्यासाठी या शब्दसंकल्प वारीचा अट्टाहास......**

विकासाच्या प्रत्येक टप्प्यात विज्ञानाची साथ निश्चित मोलाची ठरते, यामुळेच गोवंश विकासासाठी सुधारित व्यवस्थापन पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानासह कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर आधुनिक युगात केला जात आहे. देशी गोवंश भारतीय संस्कृतीत अतिशय जिव्हाळ्याचा आणि जनमानसात उच्चस्थानी असलेला विषय सध्या सेंद्रिय शेती पद्धतीत अभिमानाने स्वीकृत असून राष्ट्र, अर्थ, कुटुंब, कृषी, आरोग्य रक्षणाशी निगडित असणारी गो आधारित शेती पद्धती ग्रामीण स्तरावर सतत मंथनात आणि प्रयोगशील कार्यातून समृद्ध केली जात आहे. यात केंद्रस्थानी असणारी गाय समजावून घेणे, योग्य प्रकारे शुद्ध वंशात जतन करणे आणि काळानुरूप विकसित करणे महत्त्वाचे ठरते.

**देशी आणि भारतीय गाय**

पूर्वीच्या समृद्ध भारतीय उपखंडात गोवंश वर्षानुवर्ष सांभाळला गेला आहे. देशाच्या प्रत्येक भागात हवामान, निसर्ग, चारा प्रकार, संस्कृती, व्यावसायिक अनिवार्यता यासह अनेक घटकांवर आधारित पूर्वापार झालेल्या गोपालनातून त्या त्या भागात गोवंश वृद्धिंगत झाला आणि पशुपालकांनी गोधनाचे जतन आणि संवर्धनासाठी यशस्वी प्रयत्न केले. मूळ शुद्ध गोवंश अशाप्रकारे ठराविक विभागात मोठ्या प्रमाणात पैदास करण्यात आला आणि त्याचा बोलबाला प्रत्येक घरात गाय सांभाळण्यातून दिसून आला. अर्थ असा की, आपल्या देशात पूर्वी देशी आणि भारतीय वंशाच्या राज्यनिहाय एक अशा ३० गोवंश जाती विकसित झाल्या.

**गोवंश संरक्षणाच्या गोशाळा**

ज्यांना गाय सांभाळणे परवडत नाही अशा सर्व गोपालकांसाठी राज्यातील गोशाळा सरसावल्या असून गोरक्षण हाच महत्त्वाचा आणि मग प्रेरित होऊन केलेला कर्तव्याचा भाग गोशाळाकडून राबवला जात आहे. गोरक्षक आणि गोशाळा यामुळेच राज्यातील गोहत्या प्रतिबंधक कायदा राबवणे शासनास शक्य आहे. राज्यातील गोपालन करणाऱ्या गोशाळांना आर्थिक मदतीचा काही भाग शासनाकडून पुरविला जात असला तरी सामाजिक दातृत्वाशिवाय सुयोग्य गोवंश सांभाळ गोशाळांना घडवणे शक्य होत नाही. तरीही राज्यातील आत्मनिर्भर असणाऱ्या गोशाळांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे.

शेतकऱ्याच्या गोठ्यातली गाय किंवा गोशाळेतील गाय आर्थिक फायदेशीर होण्यासाठी शुद्ध वंशाची असणे, शुद्ध वंशात परिवर्तित करण्यासाठी प्रयत्न होणे, नियमित प्रजननातून दुधाचा स्रोत निर्माण करणे, गोमय- गोमूत्र मूल्यवर्धन करणाऱ्या एक हजार उत्पादनांची निर्मिती शक्य करणे, गो प्रक्षेत्रासाठी बायोगॅस-सूर्यचूल तंत्र अवलंबणे, गो आधारित सेंद्रिय शेती विकसित करणे अशा सर्व बाबी निश्चित आणि शाश्वतपणे उपयुक्त ठरतात. तेव्हा गोसंवर्धनात सर्व प्रकारचे प्रयत्न जाणीवपूर्वक अवलंबणे अपेक्षित आहे आणि त्यातूनच आर्थिक आत्मनिर्भरता निर्माण होणार आहे.



## शुद्ध गोवंश संवर्धन दिनाचा संकल्प :-

राज्यातील नोंदणीकृत असलेल्या सातही शुद्ध गोवंशाच्या संख्यात्मक वाढीसाठी आणि विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. गावठी / स्थानिक / देशी अशा प्रकारे संबोधल्या जाणाऱ्या अवर्गीय म्हणजे वंशरहित गोवंशाची संख्या कमी करण्यासाठी केंद्र शासनाने "शून्य अवर्गीय गोवंश अभियान" (zero Non-descript cattle mission) अवलंबण्याची सूचना राज्य शासनाकडे केली आहे. राज्याच्या सक्षम पैदास धोरणात शुद्ध गोवंश संख्यात्मक वाढ आणि अवर्गीय गोवंश घट हेच ध्येय असून त्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचा " शुद्ध गोवंश संवर्धन दिनाचा संकल्प" अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. दरवर्षी २२ जुलै रोजी साजरा होणाऱ्या या उपक्रमातून खालील बाबी अवलंबणे अपेक्षित आहेत.



**१० जी धोरण**

- गो संगोपन
- गो संवर्धन
- गो संरक्षण
- गोमय मुल्यवर्धन
- गोशाळा
- गोरक्षक
- गोपालक
- गो आधारीत शेती
- गो साक्षरता
- गो पर्यटन

१. देशी गोवंश शुद्धतेबाबत चर्चासत्र, प्रक्षेत्रभेटी, गोशाळा भेटी, गोपालकांचे मेळावे, शुद्ध गोवंशाची प्रदर्शने, शुद्ध गोवंश निवड स्पर्धा आयोजन

२. अवर्गीय गोवंश संख्या कमी करण्यासाठी शासनाने प्रस्तावित शास्त्रीय गोपैदास धोरणाचा प्रसार आणि प्रचार

३. शुद्ध देशी गोवंश दुग्ध स्पर्धा आणि आरोग्य तपासणी शिबिरे

४. राज्यातील गोवंश पैदास कायदा २०२४ बाबत ग्रामस्तरावर जनजागृती

५. शुद्ध देशी गोवंशाबाबत सामाजिक सजगता निर्माण करणारे विविध उपक्रम

६. शुद्ध देशी गोवंशाची उत्पादने, गो उपचार पद्धती, गो आधारित सेंद्रिय शेतीबाबत माहिती

७. शुद्ध देशी गोवंशाच्या गतिमान सुधारणेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे सादरीकरण

महाराष्ट्र गोसेवा आयोग

पशुसंवर्धन आयुक्तालय, पहिला मजला,
स्पायसर कॉलेज समोर, औंध-खडकी रोड,
पुणे ४११ ०६७
दूरध्वनी : ०२० - २९९५२६६५ / २९९५०९०९
ई-मेल : cah.gosevaayogmh@mah.gov.in

महाराष्ट्र गोसेवा आयोग
संरक्षण, संगोपन, संवर्धन
गावो रक्षति रक्षितः
महाराष्ट्र शासन

# कठाणी गाय
# विदर्भाच्या अर्थकारणाला मिळेल चालना



कर्नाल येथील राष्ट्रीय पशु अनुवंशिक संसाधन ब्युरो (NBAGR) अंतर्गत महाराष्ट्रातील विदर्भ प्रदेशातील कमी ज्ञात असलेल्या गुरांच्या संख्येचे सर्वेक्षण, मूल्यांकन आणि वैशिष्ट्यीकरण नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०२० या कालावधीत पूर्ण झाल्यानंतर, BAIF ने महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन आयुक्तांच्या शिफारसीनुसार राष्ट्रीय स्तरावर या कमी ज्ञात असलेल्या गुरांच्या संख्येची नोंदणी करण्यासाठी NBAGR कडे अर्ज केला. त्यानंतर, राष्ट्रीय स्तरावर ५३ जातींपैकी कठाणी ही जात ५१ वी गुरांची जात म्हणून नोंदणीकृत झाली. विदर्भ प्रदेशातून नोंदणीकृत ही दुसरी गुरांची जात आहे. यापुर्वी गवळाऊ गोवंशाची नोंदणीकृत प्रजाती म्हणून नोंद झाली आहे. आता कठाणी ही आणखी एक नवी गोप्रजाती नोंदणीकृत झाल्याने विदर्भासह महाराष्ट्राच्या पशुवैभवात भर पडणार आहे.

**मूळ**

तत्कालीन चांदा जिल्ह्याचे मध्य प्रांत जिल्हा गॅझेटियर खंड अ, मूळतः १९०९ मध्ये छापलेले आणि २०१३ मध्ये इंडियन जर्नल ऑफ ॲनिमल सायन्स (खंड ८३ अंक ६) मध्ये सजल कुलकर्णी, आर.एल. भगत, ए.बी. पांडे आणि एस.बी. गोखले यांनी प्रकाशित केलेल्या लेखात या जातीबद्दल काही माहिती देण्यात आली. पशुपालक आणि ग्रामस्थांशी झालेल्या चर्चेतून असे दिसून आले की त्यांना या जातीचे नाव माहित नव्हते आणि या अनामिक प्राण्यांना एकतर अज्ञात म्हणून ओळखले जात होते किंवा त्यांना 'स्थानिक', 'गावठी' किंवा 'मुलखी' असे संबोधले जात होते. चांदा जिल्ह्याच्या (आताचा चंद्रपूर जिल्हा) गॅझेटियरमध्ये या प्राण्यांना "तेलंगपत्ती" असे संबोधले जात होते.

पशुपालकांच्या विविध भेटींमध्ये असे आढळून आले की, पूर्वी हा परिसर स्थानिक पातळीवर पिकवलेल्या डाळींसाठी ओळखला जात होता. हे अनामिक प्राणी चारा म्हणून 'कठानी' ज्वारीची वैरण खात असत आणि म्हणूनच त्यांना 'कठानी' असे नाव देण्यात आले. गडचिरोली शहराजवळ 'कठानी' नावाची एक नदी आहे जी वैनगंगा नदीला मिळते, ज्यामुळे बहुतेक पशुपालकांची अशी धारणा की, या नदीच्या नावावरुन सदर गोवंशास कठानी असे नाव प्रचलित झाले असावे.

**प्रजनन क्षेत्र:**

कठानी गुरे प्रामुख्याने गडचिरोली, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात आढळतात. सर्वेक्षणासाठी, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येकी चार तालुके आणि चंद्रपूर जिल्ह्यातील पाच तालुके निवडण्यात आले. गडचिरोलीतील अहेरी, एटापल्ली, चामोर्शी आणि धानोरा हे या तालुक्यांचा या सर्वेक्षणात समावेश होता. गोंदियातील अर्जुनी मोरगाव, देवरी, सडक अर्जुनी आणि सालेकसा हे व चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, गोंडपिपरी, मूल, पोंभुर्णा आणि सिंदेवाही तालुक्यामध्ये या गायीचे प्रजननक्षेत्र विस्तारलेले आढळून आले.

**निवारा:**

कठानी गुरांच्या निवाऱ्याच्या पद्धतीवरून असे दिसून आले की, जवळजवळ सर्व गुरांचे मालक त्यांच्या जनावरांना पाऊस, वारा आणि वन्य प्राण्यांपासून वाचवण्यासाठी दिवसा किंवा रात्री निवासस्थाने देत असत. बहुतेक गुरांचे मालक त्यांच्या जनावरांना उघड्या कुरणात ठेवत असत. काही शेतकऱ्यांकडे बंदिस्त निवारा होता. एकूणच स्वच्छता चांगली होती. काही शेतकऱ्यांकडे लाकडापासून किंवा वाळलेल्या कापसाच्या पेंढ्यापासून बनवलेले कच्चे छत असलेला स्वतंत्र गोठा होता आणि काही शेतकऱ्यांकडे सिमेंटिंग मटेरियल म्हणून माती वापरून विटा किंवा दगडांपासून बनवलेला पक्का गोठा होता. गोठ्यातील फरशी बहुतेक ठिकाणी कच्च्या स्वरुपाची आढळून आली. काही ठिकाणी चिखल आणि दगडांपासून बनलेली फरशी आढळून आली.

**चारा आणि चारा संसाधने:**

भाताचं पीक काढल्यानंतर स्थानिक पातळीवर 'तनीस' म्हणून ओळखल्या जाणारे कृषी उत्पादन, सोयाबीन, मूग, गहू, चवळी, हरभरा, तूर, उडीद इत्यादींचा भुसा आणि वाळलेले गवत हे या प्राण्यांसाठी चारा म्हणून वापरण्यात येते. या पशुधनाच्या प्रजनन क्षेत्रात, पावसावर आधारित सिंचनावर आधारित पीक (धान, सोयाबीन, तूर, हरभरा) घेतले जाते. म्हणूनच, हिरव्या चाऱ्याच्या अनुपस्थितीत, स्थानिक पातळीवर 'कुकुस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुस्करलेल्या घरगुती तांदळाच्या कोंडाच्या स्वरूपात केंद्रित खाद्य जनावरांना दिले जात असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले.

**प्राण्यांचे प्रजनन:**

नैसर्गिक रेतन ही गुरांच्या मालकांकडून स्वीकारली जाणारी प्रमुख आणि पसंतीची प्रजनन पद्धत आहे आणि जवळजवळ सर्व प्रजनन जनावरे चरत असताना केले जाते. नैसर्गिक रेतनासाठी वापरल्या जाणाऱ्या बैलांना निवडीचे कोणतेही निकष नसतात. नॉन-कॅस्ट्रेटेड (खच्चीकरण न केलेले) नर आणि मादी प्राणी एकत्र चरत असताना प्राण्यांचे प्रजनन करतात. कठानी बैलाच्या रेतमात्रा उपलब्ध नसल्यामुळे, ज्यांच्या जवळ कृत्रिम रेतन (एआय) साठी सुविधा होत्या त्यांनी एचएफ किंवा जर्सी बैल वीर्य वापरून त्यांच्या प्राण्यांचे प्रजनन करणे पसंत केले असल्याचे सर्वेक्षणात काही ठिकाणी दिसून आले.

**शारीरिक गुणवैशिष्ट्ये:**

कठानी गोवंश मध्यम आकाराचा म्हणून ओळखला जातो. वर्ण पांढरा, काळा आणि लालसर अशा तीन वेगवेगळ्या रंगांचा व ठिपकेदार असतो. बहुतेक प्राण्यांमध्ये काळे थूथन असते. बहुतेक प्राण्यांमध्ये पापण्या आणि डोळ्याच्या बुबुळाचा रंग पूर्णपणे काळा असतो. तथापि, काही प्राण्यांमध्ये गाजराच्या रंगाच्या पापण्या आणि डोळ्याच्या बुबुळांचेदेखील निरीक्षण केले गेले. काळ्या रंगाचे खूर असलेल्या प्राण्यांची संख्या सर्वात जास्त असल्याचे दिसून आले. या गोवंशीय पशुधनास सरळ तसेच वक्र शिंगे असतात आणि काळ्या रंगाचे शिंगे अधिक प्रमाणात आढळून येतात. टोकदार टोकांसह काहिशी बाहेर वाकलेली शिंगे स्थानिक पशुपालकांना पसंत होती. या पशुधनाचे कपाळ सरळ, आडवे कान आणि शेपटीची स्थिती गुडघ्याच्या पातळीवर तसेच गुडघ्याच्या खाली असते. या प्राण्यांचा स्वभाव मध्यम आणि विनम्र असल्याचे दिसून आले.

**पुनरुत्पादन:**

इंडियन जर्नल ऑफ ॲनिमल सायन्सेस, खंड ९२, अंक १०, पृष्ठ ११८२-११८८ मध्ये प्रकाशित माहितीनुसार, पुनरुत्पादन मापदंडांवरून असे दिसून आले की नरांचे सरासरी जन्म वजन १२ ते १८ किलो होते, तर मादींचे ११ ते १९ किलो होते. कठानी प्रजनन बैलाचे पहिले वीर्य स्खलन आणि पहिले रेतन करताना सरासरी वय अनुक्रमे ३६ आणि ३९ महिने नोंदवले गेले. पहिल्या प्रसूतीच्या वेळी वय ५४ ते ५५ महिने होते.



**उत्पादन:** प्रजनन क्षेत्रात दुधाच्या उद्देशाने या प्राण्यांचे संगोपन येथील प्रचलित पद्धत नाही. म्हणूनच, सर्व शेतकऱ्यांनी उत्पादीत दुधाचा वापर वासराला व काही प्रमाणात आपल्या दैनंदिन आहारातच करण्यास प्राधान्य दिले आहे. वासराचा सरासरी दूध पिण्याचा कालावधी ७ ते ८ महिने होता आणि सरासरी दूध उत्पादन दररोज १.५ ते २.५ लिटर होते. सरासरी भाकड कालावधी २४५ ते २६० दिवसांचा होता.



लेखक: डॉ. आर. एल. भगत, BAIF




कृषिप्रधान भारतात आधुनिकतेचे वारे वाहत असले तरी पारंपारिक सण व उत्सवांचे महत्व आजही अबाधित आहे. मानवाच्या एकूणच प्रगतीत पशुधनाचे महत्व तर अनन्य साधारण राहिले आहे. पशुधनाच्या उपकारातून उतराई होण्याचा प्रयत्न मानव विविध सण उत्सवांतून नेहमीच करत असतो. त्यापैकीच एक सण म्हणजे बेंदूर होय. फार पुर्वीपासून शेतीच्या बहुतांश कामांमध्ये बैलांचा वापर केला जातो. शेतकरीसुद्धा आपल्या बैलांची पोटच्या पोरांप्रमाणे काळजी घेत असतात. त्यांचा सांभाळ प्रेमाने करतात. बैलांच्या अपार कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच शेतकरी बांधव बेंदूर सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. पश्चिम महाराष्ट्रात बेंदूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या सणाला महाराष्ट्राच्या इतर भागात बैल पोळा असेही म्हटले जाते.

**श्री. संतोष पवार**
पशुधन पर्यवेक्षक, 'महापशुधन वार्ता', पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

बेंदूर / पोळा हा सण महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात बेंदूर हा सण तीन वेगवेगळ्या तिथींना साजरा होतो. जेष्ठ महिन्याच्या पौर्णिमेला महाराष्ट्रातील पश्चिम भागातील काही ठिकाणी कर्नाटकी बेंदूर साजरा करतात. यानंतर येणाऱ्या आषाढ महिन्यातील पौर्णिमेला महाराष्ट्रीय बेंदूर साजरा करतात. बहुतांश भागात महाराष्ट्रीय बेंदूर साजरा केला जातो. तर श्रावण महिन्यातील अमावस्येला बैलपोळा साजरा केला जातो. विदर्भात बैलपोळा साजरा होतो.

पावसाळा सुरू झाला की शेतातील पेरणी व लागवडीची कामे सुरू होतात. आषाढातील मुसळधार पावसाला सुरुवात होईपर्यंत शेतातील बहुतांश कामे पूर्ण झालेली असतात. शेतकऱ्यांना थोडी उसंत मिळालेली असते. याचदरम्यान शेतकरी आपल्या बैलांच्या अपार कष्टाची जाणीव ठेवून, बेंदूर सण साजरा करतात. संपूर्ण महाराष्ट्रात एकाचवेळी पावसाला सुरुवात होत नाही. केरळ किनारपट्टीवरून आलेला पाऊस आधी पश्चिम महाराष्ट्रात दाखल होतो, यानंतर तो पुढे मध्य महाराष्ट्रात सरकतो व तसाच तो पुढे विदर्भात जातो.

पाऊस टप्प्याटप्प्याने पुढे सरकतो. यामुळे संबधित भागातील शेतीची कामे त्या अनुषंगाने पूर्ण होतात. या भौगोलिक कारणामुळे कदाचित तीन वेगवेगळ्या तिथींना महाराष्ट्रातील बेंदूर / पोळा सण साजरा करतात. या सणाची नावे व साजरी करण्याची तिथी जरी वेगळी असली, तरी बेंदूर सण साजरा करण्याची पद्धत व त्यामागील भावना एकच आहे.

**बेंदूर सणासाठीची पूर्वतयारी-:** बेंदूर सणाच्या साधारण चार दिवस अगोदर मातीचे बैल विक्री करण्यासाठी कुंभारदादा गावोगावी तसेच शहरातही फिरतात. बहुतांश घरांमध्ये मातीच्या बैलांची जोडी खरेदी केली जाते. हल्ली काही ठिकाणी मातीच्या बैलांना छान रंग देऊन अलंकारीक पद्धतीने सजवतात. बेंदराच्या आदल्या दिवशी या बैलजोडीची श्रद्धेने पूजा करून त्यांना नैवेद्य दाखवतात.

**खांदेमळणी-:** बेंदराच्या आदल्या दिवशी, शेतकरी आपल्या लाडक्या बैलांची खांदेमळणी करतात. यामध्ये शेतकरी बैलांच्या खांद्यांची तेल लावून मालिश करतात. यानंतर त्यांना गरम पाण्याने अंघोळ घालतात. यानंतर त्यांना खिचडा खायला घालतात. या खिचड्यामध्ये पाच वेगवेगळ्या प्रकारची धान्य किंवा डाळी भिजवून शिजवली जातात. वर्षभर हे बैल आपल्या मालकासाठी त्यांच्या खांद्यावर ओझं घेऊन राबतात, म्हणूनच उपकृत भावनेतून त्यांची खांदेमळणी केली जाते.

### बेंदूर सण साजरा करावयाची पद्धत :-

सणाच्या दिवशी सकाळपासूनच आबालवृद्धांची तयारीसाठी लगबग सुरु असते. सकाळी दारांना तोरणं बांधतात, ही तोरणं सुंबाच्या दोरीत पिंपळाची पाने ओऊन बनवतात. सकाळी घरातील सर्व जनावरे गावच्या पाणवठ्याच्या ठिकाणी म्हणजेच, नदीवर किंवा ओढ्यावर नेऊन त्यांना आंघोळ घातली जाते. काथ्याच्या सहाय्याने बैलांना खरारा केला जातो. गोठेही स्वच्छ झाडून व धुवून काढली जातात. बैलांना आंघोळ घालुन, घरी आल्यानंतर त्यांना सजवतात. त्यांच्या शिंगांना रंग देतात. शिंगांच्या टोकांना छान तुरे लावतात. तसेच त्यांच्या शिंगांमध्ये डाळीचे पीठ व गुळ यांपासून बनवलेले कडबोळे घालतात, गळ्यात घुंगराची माळ घालतात. डोक्याला बाशिंग बांधतात. बैलांच्या अंगावर वेगवेगळे रंगीबिरंगी छाप उठवतात. त्यांच्या अंगावर छान झूल घालतात. बैलांच्या पायांमध्ये दोऱ्यापासून विणलेले तोडे घालतात. त्यांना नवीन वेसन व कासरा घालतात.

घरातील सासुरवाशिणी पारंपारिक पेहरावात तयार होतात. घरात पुरणपोळी बनवली जाते. काही ठिकाणी करंज्या व चकल्याही बनवल्या जातात. यानंतर घरातील सर्वजण मिळून बैलांची पूजा करतात, त्यांचे औक्षण करतात व त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य खायला देतात. बेंदरा दिवशी बैलांना पूर्ण दिवस आराम दिला जातो. शेतीच्या कोणत्याही कामासाठी त्यांना जुंपले जात नाही. शेतकरी आपल्या लाडक्या बैलांची या दिवशी प्रेमाने काळजी घेतात.




### मिरवणुका-:

दुपारनंतर बैलांची मिरवणुकीसाठी सजावट केली जाते. यानंतर गावातील सर्व बैलांची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. गावातील सर्व अबालवृद्ध, लहान मुली-मुले, स्त्रिया पारंपारिक वेशात या मिरवणुकीत आनंदाने सहभागी होतात. गावच्या वेशीपर्यंत या मिरवणुका काढल्या जातात.

**कर ओलांडणे-** काही ठिकाणी आजही, बेंदरादिवशी कर ओलांडायची प्रथा आहे. यामध्ये गावातल्या काही प्रतिष्ठित मानकरी लोकांच्या बैलांकडून गावच्या वेशीवर बांधलेली कर ओलांडली जाते. गाव वेशीवर चालणारा हा एक पारंपारिक सोहळा आहे. काही गावांमध्ये बैलजोडींच्या सजावटीची स्पर्धा आयोजित केली जाते. यावेळी उत्कृष्ट सजावट केलेल्या बैल जोडीला बक्षीस दिले जाते. मिरवणुकीवरून घरी आल्यानंतर, घरच्या जाणकार स्त्रिया आपल्या लाडक्या बैलजोडीवरून, भाकरीचा तुकडा ओवाळून टाकतात. त्यांचे औक्षण करून त्यांना घरात घेतात. घरी आल्यानंतर सायंकाळी त्यांची दृष्टही काढली जाते. अखंड मानव जातीसाठी लागणारी अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात राबावेच लागते. शेतकरी पारंपारिक व आधुनिक पद्धतींचा योग्य मिलाफ घडवत शेतात कष्ट करतात व अन्नधान्य पिकवतात. मात्र, हे कार्य पशुधनाच्या सहभागाशिवाय पूर्ण होत नाही.

**समारोप-** शेतात राबणारे पशुधन म्हणजे शेतकऱ्यांसाठी जणू पोटची पोरंच असतात. आपल्या मालकासाठी बैलं शेतात ईमानाने राबतात आणि याच ईमानाची जाणीव ठेवत काही अंशी त्यांची परतफेड म्हणून बैलपोळा किंवा बेंदूर हा सण कृषि संस्कृतीत मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.



# रेबीजची गोष्ट






डॉ. सुनील देशपांडे
पशुधन विकास अधिकारी (वर्ग-१),
पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ कुडाळ,
ता. जावळी, जि.सातारा. मो.क्र.९४२३८६५४५८

**अक्कासाहेब:** काय गं रखमा, कुठून आलीस गायीला घेऊनी, पाणीबिणी पाजलं नव्हतंस की काय अजून?

**रखमा:** अवं अक्कासाहेब, तुमी? या की घरात. ह्या कपिलेला बांधते दाव्याला आणि सांगते बघा तुमास्नी सगळं. बसा आत, आलेच मी!

**अक्कासाहेब:** बरं बरं. बांध तिला. अरे बापरे, या जखमा गं कसल्या दिसतायत कपिलेच्या अंगावर? अरे बापरे, खाली पोटापाशी थोडं फाटलेलं पण दिसतंय.

**रखमा:** हो ना, अक्कासाहेब काय सांगायचं तुमास्नी ? सगळा गोंधूळ झाला बघा.

**अक्कासाहेब:** गोंधळ ? कसला गं गोंधळ ?

**रखमा:** बसा अक्कासाहेब. सांगते. आवं, पहाटेच्या पारी मी दचकून जागी झाली ती कुत्र्यांच्या जोरजोरामंदी भुंकण्यामुळं.

**अक्कासाहेब:** कुत्र्यांच्या भुंकण्यामुळं ?

**रखमा:** हो ना! आवं. आम्ही समदी आत झोपल्यालो आणि भायेर गोठ्यात चावकी कुत्री टोळक्यानं आली बगा. एकदम त्यांनी कपिलेला चावायाला सुरुवात केली. कोणी पोटाला, कोणी छातीपाशी!

**अक्कासाहेब:** अरे बापरे, किती भयंकर!

**रखमा:** हो ना, अक्कासाहेब! मी पण घाबरले होते, पण हिम्मत करून काठी उगारली आणि ओरडले. तेंव्हा कुठं ती टोळी पळाली. कपिलेला माझ्या जखमा झाल्या. रगात बी आलं.

**अक्कासाहेब:** हो, चांगल्याच जखमा झाल्यात बिचारीला. मग कुठं दवाखान्यात नेलं होतंस तिला ?

**रखमा:** हो, अक्कासाहेब, सरकारी दवाखान्यात नेलं हुतं. आपल्या डॉक्टरांना दावलं.

**अक्कासाहेब:** हो, काय म्हणले डॉक्टर?

**रखमा:** डॉक्टरांनी लयी नीट तपासलं बघा कपिलेला. आधी हातात प्लास्टिकचे मोजे घातले आन् सगळ्या जखमा धुवून काढल्या पाण्यानं. कपड्याच्या साबणानं जखमा लई वेळ धुतल्या आन् सगळ्या जखमांवर पाण्याची धार धरली बघा अक्कासाहेब धा मिनटं!

**अक्कासाहेब:** अरे वा ! आन् औषध बिवषध काही लावलं की नाही?

**रखमा:** लावले की अक्कासाहेब ! तिनकर आयडीन का काय! लालगं औषधं हुतं! कपिलेला लयी चुरचुरलं बघा.

**अक्कासाहेब:** अगं, टिंक्चर आयोडीन असेल!

**रखमा:** व्हय, व्हय... त्येच त्येच! टिंक्चर आयोडीन!

**डॉक्टरसाहेब:** हम्म, रखमाताई, पुन्हा लावलं की नाही टिंक्चर आयोडीन गायीला? आहे का ती बरी?

**रखमा:** अगं बाई, डॉक्टरसाहेब. या! आवं, आमची कपिली आता बरी हाय व तुमच्यामुळं! तुमी ड्रेसिंग केलय आणि इंजेक्शन बी दिली. लई ब्येस झालं बगा. धनुर्वात आणि रेबीज की काय. बरोबर ना?

**डॉक्टरसाहेब:** रखमाताई, रेबीज! बरोबर आहे! आणि रखमाताई त्या चिठ्ठीवर तारखा पण लिहून दिलेल्या. ती चिठ्ठी ठेवली आहे ना नीट?

**रखमा:** व्हय, साहेब, अजून ४ वेळ इंजेक्शनसाठी घेऊन या म्हणून सांगितलंय नव्हं तुम्ही ?

**डॉक्टरसाहेब:** हो, अगदी बरोबर.

**अक्कासाहेब :** होय, डॉक्टरसाहेब, ही पिसाळण्याविरुध्दची लस ५वेळा द्यावी लागल नं?

**डॉक्टरसाहेब:** हो हो. पिसाळलेल्या कुत्र्यांच्या लाळेतून, चाव्यातून, चाटण्यातूनसुद्धा रेबीज नावाचा भयंकर जीवघेणा रोग इतर कुत्र्यांना, जनावरांना आणि माणसांनासुद्धा होतो. त्याच्यावर उपचार नाही. फक्त लस देऊनच त्याच्यापासून आपण बचाव करू शकतो.

**अक्कासाहेब:** पण मग, लस पाच वेळा दयायची की चौदा वेळा? माणसासारखी जनावराला सुद्धा पोटावर द्यावी लागते का लस ?

**डॉक्टरसाहेब:** नाही, अक्कासाहेब. रेबीजची लस पुर्वी चौदा वेळेला माणसाला पोटावर घ्यावी लागायची. आता माणसाला ती दंडात किंवा मांडीवर दिली जाते. जनावरांना मानेला किंवा पायावर द्यावी लागते. आणि आता चावल्यानंतर पाच वेळेला लस दिली तरी चालते.

**अक्कासाहेब:** म्हणजे हे सगळं पिसाळलेलं कुत्रा चावल्यावर ना साहेब? आधीच दिली तर लस ? आमच्या टॉमीला दिली होती नाही का तुम्ही तो तीन महिन्याचा झाल्यावर ?

**रखमाताई:** व्हय, हम्म.., आमच्याबी जॅकीला दिलं होतं डॉक्टरांनी लशीचं इंजेक्शन. बरोबर की नाही डॉक्टरसाहेब? ही पोरं आमची मिरवतच घेऊन गेली होती दवाखान्यात त्याला. सायकलवर गेली टॉमॅटोच्या कॅरेटमध्ये टाकून.

**डॉक्टरसाहेब:** खरंय, रेबीज होऊ नये म्हणून आधीच आपल्या कुत्र्यांना लस दिलीच पाहिजे. ते अतिशय महत्त्वाचं आहे.

**रखमा:** मग ती बी पाच वेळेला द्यावी लागते काय डॉक्टरसायेब?

**डॉक्टरसाहेब:** नाही, नाही, रखमाताई. रेबीज होऊ नये म्हणून जी लस दिली पाहिजे, ती प्रत्येकाने आपल्या कुत्र्याला तो तीन महिन्याचा झाला की दिलीच पाहिजे. तीन महिन्याच्या आत शक्यतो देऊ नये. त्यानंतर दरवर्षी द्यायची.



**अक्कासाहेब:** आणि साहेब, अशी कपिलेला चावली तशी कुत्री चावल्यानंतर?

**डॉक्टरसाहेब:** पिसाळलेली किंवा अशी कुत्री, ज्यांना लस दिली आहे की नाही हे आपल्याला माहित नाही, अशी कुत्री आपल्या कुत्र्यांना किंवा जनावरांना चावली तर त्यांना पाच वेळा लस द्यायची.

**अक्कासाहेब:** म्हणजे लस नक्की कधी कधी द्यायची साहेब?

**डॉक्टरसाहेब:** ज्या दिवशी आपल्या कुत्र्याला अथवा इतर जनावराला कुत्रा चावला असेल तर त्याच दिवशी रेबीजविरुद्धची पहिली लस द्यायची. त्यानंतर त्या दिवसाच्या तिसऱ्या, सातव्या, १४ व्या आणि २८ व्या दिवशी ही लस पुन्हा द्यायची.

**अक्कासाहेब :** साहेब पुन्हा दयायची म्हणजे एकूण पाच वेळा ?

**डॉक्टरसाहेब:** अगदी बरोबर !

**रखमा :** साहेब, हा रेबीज म्हणजे होतूया कशामुळे? नेमकं तंतर काय याचं?

**डॉक्टरसाहेब:** रखमाताई, सृष्टीत होणारे रोग हे जीवाणू, विषाणू, परजीवी अशा अनेक जीवांमुळे होतात, 'रेबीज' हा विषाणूमुळे होतो.

**रखमा:** असं व्हय? पण हा समद्यासनी होतूया- गायीला बी होतूया, कुत्र्याला बी होतूया, माणसास्नी बी होतूया व्हय?

**डॉक्टरसाहेब:** होय, हा रोग हा जवळपास सर्व प्राण्यांना होतो. कोणत्याही उष्ण रक्ताच्या प्राण्यांना पिसाळलेला कुत्रा, मांजर, कोल्हा, लांडगा, माकड, वटवाघुळ इत्यादी प्राणी जनावरांना किंवा माणसांना चावला की हा रोग होतो. हा रोग कुत्रा, मांजर, कोल्हा यांनाच प्रामुख्याने होतो. पण इतर प्राणीही याच्या कचाट्यात सापडू शकतात. मोठी जनावरं आणि माणसंसुद्धा!

**अक्कासाहेब:** पण साहेब, हा रोग पिसाळलेला कुत्रा चावल्यावर लगेच होतो का? म्हणजे ते जनावर लगेच पिसाळते?

**डॉक्टरसाहेब:** नाही अक्कासाहेब. पिसाळलेल्या कुत्र्याच्या लाळीत रेबीजचे असंख्य विषाणू असतात. असे बाधित कुत्रे चावल्यास किंवा दूषित लाळेचा जखमेला स्पर्श झाल्यास हे विषाणू शरीरात शिरतात. त्यांचा प्रवास मेंदूकडे होतो तो फक्त मज्जारज्जूंच्याद्वारे. एकदा मेंदूत पोचले हे विषाणू की मगच हया रोगाची लक्षणं दिसायला लागतात...

**रखमा:** म्हणजे नक्की किती दिवसांनी साहेब?

**डॉक्टरसाहेब:** रखमाताई, ह्या रोगाची लक्षणे दिसायचा काळ अगदी लहान असू शकतो आणि खूप मोठाही!

**रखमा:** म्हणजे ? सायेब, मला नाही समजले?

**डॉक्टरसाहेब:** रखमाताई, चावा घेतल्यापासून त्या प्राण्याला हा रोग ११ दिवसांनीही होऊ शकतो किंवा १-२ ते १२ वर्षानंतरही होऊ शकतो. चावा कुठे घेतला गेला यावर हे अवलंबून आहे.

**अक्कासाहेब:** म्हणजे पायापाशी चावले असेल तर डोक्यापर्यंत हा विषाणू उशिरा पोचणार.

**रखमा:** आणि नाका-तोंडाला चावलं असेल तर लवकरच पोचणार, असंच नव्हं?

**डॉक्टरसाहेब:** अगदी बरोबर! सामान्यतः २० ते ६० दिवसात याची लक्षणे दिसतात असे आढळते.

**रखमा:** कसं ओळखायचे साहेब जनावर किंवा आपले घरचं कुत्र पिसाळलं असेल तर? ते चावले एवढ्यावरनच नव्हं?

**डॉक्टरसाहेब:** रखमाताई, पिसाळलेले कुत्रे दोन प्रकारची रेबीज रोगाची लक्षणे दाखवतात.

**रखमा:** असं व्हयं? कुठली?

**डॉक्टरसाहेब:** एक असते "उत्तेजनात्मक अवस्था"- त्यात कुत्रा ओळखीच्या लोकांवरही हल्ला करून चावायला बघतो. लालबुंद डोळे होतात. तोंडातून फेसाळ लाळ टपकत राहते. बाधित कुत्रा सैरावेरा पळत सुटतो. ३-४ दिवस अशी अवस्था असते.

**रखमा:** आणि दुसरी अवस्था कुठली साहेब?

**डॉक्टरसाहेब:** दुसरी "मंद अवस्था"- याच्यामधे कुत्रे अस्वस्थ असते. तोंडातून लाळ गळत राहते. जिभ लांब करतो. शक्यतो घरातल्या अंधाऱ्या जागेचा आश्रय घेतो. अशात चुकून डिवचले गेले तर तो माणसांना चावतो.

**रखमा:** साहेब, हे झालं कुत्र्यांमध्ये...मोठी जनावरं तर चावत नाहीत. त्यांना रेबीज झाला आहे हे कसे ओळखायचं?

**अक्कासाहेब:** मोठी जनावरं पिसाळल्यावर आवाज बदलतो असं बी ऐकलं होतं.

**डॉक्टरसाहेब:** अगदी बरोबर. अक्कासाहेब त्यांचा आवाज घोगरा होतो. तोंडातून लाळ गळू लागते. डोळे मोठे करतात, जनावरं अस्वस्थ होतात.

**रखमाताई:** आवं, आमच्या माहेरी एकदा शेजारच्या गायीची अशीच लाळ गळत हुती, खात नव्हती म्हणून त्यांनी दोन दिवस तोंडात हात घालून हळद, औषध त्या मालकांनी चोळली आणि गाय मेली की साहेब दोन दिवसात. मग काय? डॉक्टरसाहेब म्हणले घ्या इंजेक्शन! घेतली मग! काय करणार?

**डॉक्टरसाहेब:** रेबीजच्या लक्षणांचा तीसरा प्रकार म्हणजे कुत्र्याला अर्धांगवायूचा झटका येतो. शरीर लुळे पडते. नीट उभे राहता येत नाही. तो झोकांड्या खातो. नेहमी वाकडी असलेली शेपटी सरळ होते. पाणी पिता येत नाही. खाता येत नाही. हळूहळू श्वास बंद पडून कुत्रे दगावते.

**अक्कासाहेब:** हम्म. म्हणजे लक्षणांवर बारीक नजर ठेवली तर कुत्रे जनावराला किंवा कुत्र्याला चावलेले आहे की नाही हे माहित नसातानासुध्दा आता आमची रखमासुध्दा रेबीज ओळखू शकेल तर!

**डॉक्टरसाहेब:** नक्कीच तीला 'रेबीज'चं गांभीर्य समजले आहेच. सर्व कुत्रे पळणाऱ्यांना जेव्हा हे कळेल आणि ते सर्वजण दरवर्षी आपापल्या कुत्र्यांना दरवर्षी लशी देतील, भटक्या कुत्र्यांना लशी देण्याचे काम गावोगावी स्थानिक स्वराज्य संस्था व समाजसेवी संघटना नियमितपणे घेतील; भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी काळजीपूर्वक व नियमितपणे केल्या जातील.

**अक्कासाहेब:** तेव्हाच आपली जनावरे आणि माणसेही रबीजमुक्त होतील. होय ना साहेब?

**डॉक्टरसाहेब:** अगदी बरोबर!

**रखमा:** द्या मग घोषणा अक्कासाहेब...

"कुत्र्यांना, गुरांना लस रेबीजची
सुरक्षा होईल साऱ्या प्राणीजातीची."



# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ३ रा, प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

माहे जुलै-२०२५





पशुधनाच्या आढळस्थानावरुन एखाद्या प्रदेशाची ओळख चिन्हांकित होण्याची ही महाराष्ट्रातील कदाचित पहिलीच घटना असावी. आटपाटी (जि. सांगली) तालुक्यात माडग्याळ मेंढी प्रजातीचे आढळस्थान असून, नाकाला रोमन पद्धतीचा बाक  असलेल्या या मेंढ्यांच्या उच्च उत्पादनक्षमतेमुळे ग्रामीण अर्थकारणाला मोठी चालना मिळाली आहे. या प्रजातीमुळे तालुक्याला मिळालेली प्रसिद्धी व प्रतिष्ठा लक्षात घेता स्थानिक प्रशासनाद्वारा सुशोभित वाहतूक बेटावर माडग्याळ मेंढीची प्रतिकृती उभारण्यात आली आहे.